मार्च २०२६

# आपलं मंत्रालय

## एक सुसंवाद



*अतिथी संपादक*

**विकास खारगे** (आय.ए.एस.)

अपर मुख्य सचिव, महसूल विभाग.

# विश्व मराठी संमेलनात 'आपलं मंत्रालय'च्या विशेषांकाचे प्रकाशन

माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयातर्फे प्रकाशित केल्या जाणाऱ्या 'आपलं मंत्रालय' या नियतकालिकाच्या मराठी भाषा विशेषांकाचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते चौथ्या विश्व मराठी संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी करण्यात आले.

यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत, खासदार डॉ. शोभा बच्छाव, खासदार राजाभाऊ वाजे, महापौर हिमगौरी आडके–आहेर, आमदार किशोर दराडे, आमदार माणिकराव कोकाटे, आमदार ॲड. राहुल ढिकले, आमदार देवयानी फरांदे, आमदार सीमा हिरे, उपमहापौर विलास शिंदे, ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त साहित्यिक डॉ. भालचंद्र नेमाडे, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती महामंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, माजी अध्यक्ष मधु मंगेश कर्णिक, संमेलनाचे स्वागताध्यक्ष तथा मविप्र संस्थेचे सरचिटणीस नितीन ठाकरे आदी उपस्थित होते.

'आपलं मंत्रालय' या नियतकालिकाचा विशेषांक मराठी भाषा गौरव दिनानिमित्त प्रकाशित करण्यात आला आहे. मंत्री श्री. सामंत हे या अंकाचे अतिथी संपादक असून माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक ब्रिजेश सिंह हे मुख्य संपादक आहेत.

या विशेषांकात अभिजात मराठी भाषा : इतिहास, वर्तमान आणि भविष्य, जयपूर साहित्य उत्सवात मराठी भाषा विभागाची पताका, मराठी : राजभाषा, मराठी भाषा विभाग, मराठी भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था, मराठी विज्ञान परिषद, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, मराठी विश्वकोशाचे अभिमान गीत, मराठी भाषा भवन, उत्सव अभिजात मराठीच आदी माहितीपर लेख आहेत.




मराठी साहित्य विश्वामधील कोल्हापूरचे योगदान, आजपर्यंतची मराठी साहित्य संमेलने, शासकीय कामकाजात मराठीचा वापर, स्त्री संतांचे अभंग, मराठीला आकार देणारे महानुभाव साहित्य तसेच भाषेच्या इतिहासात अकोल्याचे अनन्यसाधारण स्थान अशा विविध विषयांवरील अभ्यासपूर्ण लेखांमुळे हा अंक विशेष संग्राह्य ठरतो. मराठी भाषा, साहित्य आणि सांस्कृतिक परंपरेची समृद्ध झलक या अंकातून वाचकांना अनुभवायला मिळते. प्रदर्शनस्थळी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या दलानात हा अंक वाचकांसाठी मोफत उपलब्ध करून देण्यात आला होता. मराठीच्या वैभवशाली परंपरेची ओळख नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा हा एक महत्त्वपूर्ण उपक्रम ठरत आहे.

**टीम आपलं मंत्रालय**

## ६ वाचू आनंदे

वाचन करणे मला नेहमीच आवडते व ते माझ्या जीवनामध्ये जिव्हाळ्याचे स्थळ राहिले आहे. आई आणि शाळेतील बाई यांनी दिलेला हा वाचनाचा वसा अगदी मुंबई विद्यापीठातून इंजिनीअरिंग करतानाही निरंतर सोबत होता. आयुष्याच्या प्रवासात शिक्षण, लग्न, कुटुंब, नोकरी या निमित्ताने ठिकाणे बदलली, तरी पुस्तक आणि वाचनाची साथ कायम राहिली; तसेच ती घट्टही होत गेली.

## १७ निसर्गरम्य भंडारदरा!

अकोले तालुका (जि. अहिल्यानगर) हा निसर्गसौंदर्याने नटलेला तालुका आहे. भंडारदरा, हरिश्चंद्रगड परिसर म्हणजे पृथ्वीवरचा अक्षरशः स्वर्गच! या परिसरात विशेषतः पावसाळ्यातील दृश्य फार विलोभनीय असते. ठिकठिकाणी दिसणारे धबधबे, हिरवा शालू परिधान केलेली रानसम्राज्ञी, इटुकल्या-पिटुकल्या सोनकीसारख्या रानफुलांचा पुष्पोत्सव, रुंजी घालणाऱ्या फुलांना बिलगणाऱ्या मधमाशा या परिसराची माहिती आहे, परंतु याहीपेक्षा निसर्गसौंदर्याची मुक्त उधळण आहे.



## २४ मानवतेचा, समतेचा आणि सेवाभावाचा तेजस्वी आदर्श

भारतीय संस्कृती आणि धर्मपरंपरा विविधतेत एकतेचा संदेश देणारी आहे. या महान परंपरेतील शीख धर्म हा मानवता, समता, सेवा आणि बंधुभाव यांचा संदेश देणारा एक प्रभावी धर्म म्हणून ओळखला जातो. शीख धर्माची सर्वात वैशिष्ट्यपूर्ण आणि जागतिक स्तरावर आदर्श ठरलेली परंपरा म्हणजे 'लंगर सेवा'. लंगर सेवा ही केवळ धार्मिक विधी नसून, ती सामाजिक समतेची, परोपकाराची आणि मानवी करुणेची जिवंत परंपरा आहे.



## २८ शिवविचारांची सजीव परंपरा



'शिवजयंती २०२६' निमित्त घाटकोपर (पूर्व) येथील शासकीय वसाहतीमध्ये विविध नावीन्यपूर्ण आणि प्रेरणादायी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. छत्रपतींच्या विचारांचा जागर व्हावा; तसेच युवा पिढीमध्ये आपल्या इतिहासाबद्दल अभिमान आणि जागरूकता निर्माण व्हावी, यासाठी वसाहतीतील मुलांनी स्वत: पोवाडे, समूहगायन यासह शिवनाट्याचे सादरीकरण केले. यंदाच्या शिवजयंतीचे मुख्य आकर्षण ठरली ती किल्ले बांधणी स्पर्धा...


वाचू आनंदे ६
मना सज्जना १०
नागझिऱ्याची प्रेमकथा १२
कविता १३
रंगसंगती सुलेखन भाग - ७ १४
जावे विनोदाच्या गावा :
विधिमंडळातील एक अविस्मरणीय क्षण! १५
रंगांच्या विश्वात हरवलेला क्षण! १६
निसर्गरम्य भंडारदरा! १७
कर्मयोगी संत गाडगेबाबा आणि समाजप्रबोधन १९
क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले :
स्त्रीशिक्षणाच्या लढ्यातील अग्रणी दीपस्तंभ २१
समतेचा आणि भक्तीचा संदेश देणारे महान संत :
संत तुकाराम महाराज २२
संजीवन समाधी २३
मानवतेचा, समतेचा आणि सेवाभावाचा तेजस्वी आदर्श २४
बाईपण! २६
समता आणि समतोल २७
शिवविचारांची सजीव परंपरा २८
सूर्याचे सोनेरी कंकण ३०
चैत्र पाडवा : सातवाहन परंपरेतून उमललेले नववर्ष ३१
मैसूर ३२
आयुष्य जगण्याचे डॉ. अब्दुल कलाम यांचे नियम ३३
साहित्य अकादमी पुरस्कार २०२५ जाहीर;
'काळ्यानिळ्या रेषा'साठी सन्मान ३४
गल्फ फूड २०२६ : दुबई वर्ल्ड ट्रेड सेंटर ३५
कृत्रिम बुद्धिमत्ता भाग -१
कल्पनेपासून क्रांतीपर्यंतचा महाप्रवास ३६
चॅटबॉट म्हणजे काय? ३८

वर्ष ३ रे । अंक ११ । मार्च २०२६

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

आपलं मंत्रालय

संपादन

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संकल्पना, मुखपृष्ठ — अजय भोसले
- व्यवस्थापकीय संपादक — किशोर गांगुर्डे
- संपादक — गोविंद अहंकारी
- सहसंपादक — अर्चना देशमुख, अश्विनी पुजारी
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर
- मुद्रण — वृंदावन एंटरप्रायजेस प्रा. लि., सिडको बस स्टॉप, ठाणे (प.)

पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०० ०३२.
Email : aaplemantralay@gmail.com

फॉलो करा...www.twitter.com&MahaDGIPR
लाइक करा...www.facebook.com&dgipr

**प्रतिक्रियांचे स्वागत**

आपलं मंत्रालय या नियतकालिकाची
गुणवत्ता वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आणि
सूचनांचे स्वागत आहे.

**'आपलं मंत्रालय' नियतकालिक ही गृहपत्रिका असून या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.**

# सिंधुदुर्ग सागरी किल्ले अध्ययन केंद्रास मान्यता

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सिंधुदुर्ग, राजकोट, सर्जेकोट, व पद्मदुर्ग या सागरी किल्ल्यांची माहिती संकलन, व्यवस्थापन व अध्ययन केंद्र मालवण येथे स्थापण करण्याची मान्यता दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ या शासन निर्णयान्वये देण्यात आली आहे.

मुंबई विद्यापीठ मुंबई यांच्या अधिनस्थ असणारे कृ.सी.देसाई शिक्षण मंडळ, संचलित स.का. पाटील सिंधुदुर्ग कला, वाणिज्य व देशभक्त शंकरराव गवाणकर विज्ञान महाविद्यालय, मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग येथे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सिंधुदुर्ग, राजकोट, सर्जेकोट, व पद्मदुर्ग या किल्ल्यांची माहिती संकलित करणे, या जलदुर्गांचा सखोल


सिंधुदुर्ग किल्ला


पद्मदुर्ग किल्ला


राजकोट किल्ला


सर्जेकोट किल्ला

अभ्यास व संशोधन करणे, या उद्दिष्टांसह अध्ययन केंद्र स्थापन करण्यासाठी अंदाजित रुपये ५० लाख इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

शिवकालीन काळात व्यापाराच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण स्थान असलेल्या या परिसरातील ऐतिहासिक पुरावे व दाखल्यांचा सखोल अभ्यास करून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रम व दूरदृष्टीचा व्यापक प्रसार करण्यास या उपक्रमामुळे चालना मिळणार आहे.

या निर्णयामुळे संबंधित किल्ल्यांबाबत प्रमाणित, अभ्यासपूर्ण व संदर्भाधारित माहिती जनतेस उपलब्ध होणार असून, युवकांमध्ये इतिहासाविषयी जाणीव, अभिरुची व प्रेरणा निर्माण होण्यास मदत होईल, असे मंत्री आशिष शेलार यांनी नमूद केले.

# विविधतेतून उलगडणारा ज्ञानाचा प्रवास

मानवी जीवनात शब्दांचे, विचारांचे आणि अनुभूतींचे एक वेगळेच विश्व दडलेले असते. त्या विश्वाकडे जाण्याचा सर्वात सुंदर मार्ग म्हणजे वाचन. 'आपलं मंत्रालय' हे मासिक केवळ लेखनाचे व्यासपीठ नसून, विचारांची देवाणघेवाण, अनुभवांची मांडणी आणि सर्जनशीलतेचा सन्मान करणारा एक सशक्त सेतू आहे. या माध्यमातून मंत्रालयातील अधिकारी व कर्मचारी यांना स्वतःला व्यक्त करण्याची; तसेच एकमेकांशी संवाद साधण्याची संधी मिळते. त्यामुळे आपुलकी, एकात्मता आणि टीम स्पिरीट दृढ होण्यास निश्चितच मदत होते.

आजच्या वेगवान आणि तंत्रज्ञानप्रधान युगात माहितीची अनेक साधने उपलब्ध झाली असली, तरी सखोल आणि विचारपूर्वक वाचनाचे महत्त्व तितकेच अधोरेखित राहते. वाचन माणसाला समृद्ध करते, संवेदनशील बनवते आणि जीवनाकडे पाहण्याची व्यापक दृष्टी देते. याच उद्देशाने 'आपलं मंत्रालय'चा प्रत्येक अंक विविध विषयांची समृद्ध मेजवानी घेऊन वाचकांसमोर येत असतो.

मार्च महिन्याचा हा अंक वाचकांसमोर देत असताना विविध विषयांचा बहुरंगी पट जणू हळूहळू उलगडत जातो, अशी अनुभूती देणारा आहे. प्रत्येक पानावर एक नवा विचार, एक नवा अनुभव आणि एक वेगळी जाणीव देणारा आहे. या अंकात निसर्गाच्या सान्निध्यात घेऊन जाणारी प्रवासवर्णने आणि अनुभवकथने वाचकांना मन:शांतीचा स्पर्श देतात. निसर्गाचे सूक्ष्म सौंदर्य टिपताना माणूस आणि पर्यावरण यांच्यातील नातेसंबंधही अधिक घट्टपणे जाणवतात. त्याचवेळी सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांची जपणूक करणारे लेख आपल्या परंपरेची जाणीव करून देतात आणि वर्तमानाशी संवाद साधण्यास प्रवृत्त करतात.

प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचे विचारलेख वाचकांच्या मनात नवी ऊर्जा जागवतात. त्यांच्या कार्यातून आणि जीवनप्रवासातून मिळणारे धडे केवळ यशाची नव्हे, तर मूल्यांचीही दिशा दाखवणारे आहेत. साहित्यिक अंगाने हा अंक अधिक समृद्ध करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यामध्ये कथा, कविता आणि कलात्मक लेखन यामधून सर्जनशीलतेचा एक मुक्त आविष्कार येथे अनुभवता येतो.

याचबरोबर आधुनिकतेची कास धरत, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) या विषयावर आधारित लेख वाचकांना नव्या तंत्रज्ञानाच्या दिशेने विचार करायला भाग पाडणारे आहेत. बदलत्या काळाची जाणीव ठेवत, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या नव्या क्षितिजांची ओळख करून देणे हे या अंकाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

निसर्ग, समाज, संस्कृती, इतिहास आणि आधुनिक विज्ञान यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न या अंकात केला आहे. ही मांडणी केवळ माहितीपर नाही, तर वाचकांच्या विचारविश्वाला चालना देणारी, संवेदनांना स्पर्श करणारी आहे. विशेषतः नव्या पिढीला प्रेरणा देणारे आणि मूल्याधिष्ठित विचार रुजवणारे लेख या अंकाला अधिक अर्थपूर्ण बनवतात.

विविधतेतून उलगडणारा हा ज्ञानप्रवास वाचकांच्या मनात नवे विचार, नव्या प्रेरणा निर्माण करेल, असा विश्वास आहे. वाचनाचा आनंद द्विगुणित करणारा हा अंक आपल्याला निश्चितच आवडेल, अशी अपेक्षा.

**विकास खारगे (आय.ए.एस.)**
**अपर मुख्य सचिव (महसूल)**
(अतिथी संपादक)

अमृतवेल ONLINE

**वाचन करणे मला नेहमीच आवडते व ते माझ्या जीवनामध्ये जिव्हाळ्याचे स्थान राहिले आहे. आई आणि शाळेतील बाई यांनी दिलेला हा वाचनाचा वसा अगदी मुंबई विद्यापीठातून इंजिनिअरिंग करतानाही निरंतर सोबत होता. आयुष्याच्या प्रवासात शिक्षण, लग्न, कुटुंब, नोकरी यानिमित्ताने ठिकाणे बदलली तरी पुस्तक आणि वाचनाची साथ कायम राहिली, तसेच ती घट्टही होत गेली. किंबहुना वाचन हा जीवनाचा अविभाज्य भाग बनला...**

■ **लिना संखे,**
उपसचिव, मंत्रालय मुंबई

# वाचू आनंदे!



**लीना संखे**

घरात वाचणारी आई आणि शालेय जीवनात साहित्याची गोडी लावणाऱ्या संस्कृतच्या बाई या दोन महत्त्वाच्या स्त्रियांनी आयुष्यात पुस्तकांचं दार उघडून त्यातून सर्वदूर पसरलेली सोनेरी किरणं दाखवत रम्य वाचन प्रवासाची सुरुवात करून दिली. हा प्रवास नक्की कुठून सुरू झाला? पुस्तक पाहिल्याची माझी अगदी जुन्यात जुनी आठवण म्हणजे आईच्या हातातली लाल रंगाचे कव्हर असलेली शेगावच्या गजानन महाराजांची पोथी.

भल्या पहाटे न्हाऊन ओल्या मोकळ्या केसानं, कपाळावर हळद–कुंकू लावून, तन्मयतेने देव्हाऱ्यासमोर त्या पोथीचं स्वच्छ, शुद्ध, स्पष्ट शब्दांत पारायण करणाऱ्या आईचं पाटावर बसलेलं रूप आजही अगदी ठळकपणे जसंच्या तसं माझ्या नजरेसमोर उभं राहतं. माझ्या आयुष्यातलं मी पाहिलेलं पहिल्या वाचकाचं रूप हेच. त्या पोथीतले २१ अध्याय किंवा त्यातल्या प्रत्येक ओवीचं सौंदर्य अथवा त्या कथेतील माहात्म्य समजण्याइतकी त्यावेळी उमज नसली तरी त्यातले कानावर पडणारे शब्द, यमक आणि कथा यांनी आम्हाला बालवयात चांगलीच भुरळ घातली होती. त्यावेळेस म्हणजे साधारणतः १९८८च्या सुमारास मनोरंजनासाठी तशीही खूप साधनं नसल्याने घरात, आजूबाजूला घडणाऱ्या अशा प्रत्येक कृतीत, प्रसंगात मन अगदी गुंतून जात असे. उन्हाळ्याच्या सुट्टीत आम्ही सारी मावसभावंडे आजोळी आजीने पेटीत ठेवलेल्या जुन्या चांदोबाच्या अंकावर अक्षरशः तुटून पडत असू. आई–बाबा ऑफिसमधून येताना 'ठक ठक'चा अंक घेऊन आले की, तो प्रथम आपल्या हाती पडावा म्हणून आमच्यात अगदी चढाओढ लागत

असे. शालेय जीवनात 'वाचनालय' नावाचं पुस्तकाचं एक स्वतंत्र घर असतं, हा लागलेला शोध खूप सुखावह, तरीपण या वाचनालयावर आपला हक्क असतो, अशी जाणीव का कोण जाणे तेव्हा रुजली नाही. फक्त आंतरशालेय वक्तृत्वस्पर्धेसाठी भाषण लिहिताना स्वातंत्र्यवीर सावरकर, भगतसिंग यांची चरित्र मराठीच्या बाईंनी मला दिली होती. त्याचं कसलं अपार कौतुक वाटलं होतं. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या

"आयुष्यातले काही दिवस कायम हृदयात राहतात, तशा पहिल्या काव्यसंग्रह प्रकाशन सोहळ्याच्या आठवणी जशाच्या तशा मनात ताज्या आहेत. गेली ५० वर्षे जनसामान्यांपर्यंत वाचन चळवळीच्या स्वरूपात पोहोचलेल्या ग्रंथाली प्रकाशनाकडून माझा 'अनात्म' हा काव्यसंग्रह प्रकाशित होत असल्याने आधीच मनातला आनंद ओसंडून वाहत होता. 'ग्रंथाली'चे सुदेशजी हिंगलासपूरकर, अरुण जोशी, संपादक, धनश्री धारप, कार्यक्रम व्यवस्थापक यांनी घरचंच कार्य असल्यासारखा या सोहळ्याचा बेत आखला. त्यातून सुदेशजींनी जेव्हा हा कार्यक्रम राष्ट्रीय संगीत नाट्य केंद्र (एनसीपीए) यांच्या संयुक्त विद्यमाने करत असल्याची बातमी दिली, तेव्हा तर आनंद सर्वत्र दुडुदुडु धावू लागला. एनसीपीए ही आधीपासूनच माझ्या हृदयात खास स्थान असलेली संस्था. जेआरडी टाटा आणि जमशेट भाभांच्या स्वप्नातून साकारलेल्या, पु.ल. देशपांडे, विजयाबाई मेहता या दिग्गजांनी संचालक म्हणून घडविलेल्या संस्थेत आपला कवितासंग्रह प्रकाशित होणार ही भावना अत्यंत सुखावह आणि प्रेरणादायी होती. डॉ. सुजाता जाधव यांनी एनसीपीएमध्ये सुरू केलेल्या 'पेज टू स्टेज' या अभिनव उपक्रमांतर्गत हा पुस्तक प्रकाशन सोहळा आयोजित केला होता. संदर्भ विभागाबरोबर 'पेज टू स्टेज' या उपक्रमांतर्गत साहित्याधारित नावीन्यपूर्ण कार्यक्रम करून डॉ. सुजाता जाधव व त्यांचे सहकारी मराठी वाचकांची व कलाकारांची पावले एनसीपीएकडे वळविण्याच्या दृष्टीने स्पृहणीय कामगिरी करीत आहेत. व्यक्तिशः माझा उत्साह वाढविणारी घटना म्हणजे प्रशासनातील आदरणीय व्यक्तिमत्त्व राज्याचे तत्कालीन मुख्य सचिव नितीन करीर सर; तसेच अध्यक्ष आणि मार्गदर्शिका म्हणून तत्कालीन अप्पर मुख्य सचिव (गृह) सुजाता सौनिक मॅडम यांनी विशेष अतिथी म्हणून या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनासाठी आनंदाने 'ग्रंथाली'ला होकार दिला.

माझे माहेर व सासरचे कुटुंबीय, जिव्हाळ्याच्या मित्र-मैत्रिणी, मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी ३० वर्षांनंतर भेटलेल्या संस्कृतच्या शिक्षिका डॉ. सुनीता पाटील, जिव्हाळ्याच्या स्नेही उमाताई नाबर; तसेच मार्गदर्शक व स्नेही अजित कवडे सर, शिवाजी मानकर सर व नामांकित चित्रकार व 'अनात्म' काव्यसंग्रहाचे लाजवाब मुखपृष्ठ साकारणारे स्नेही डॉ. संतोष क्षीरसागर अशा सगळ्यांना या सर्जनशील सोहळ्यासाठी आवर्जून प्रेक्षकांत उपस्थित राहताना पाहणे, खरंच अत्यंत भावनिक, डोळ्यांचे पारणे फेडणारे! त्यामुळेच की काय, प्रत्यक्ष प्रकाशनाच्या वेळी मनोगत व्यक्त करताना कागदावर लिहिलेले शब्द कागदावरच राहिले आणि मनातले शब्द ओठांवर उमटून आले. शिक्षिका डॉ. सुनीता पाटील यांनी माझ्यावर केलेल्या कवितेने बहुमूल्य आशीर्वाद बहाल केले. त्यांची सुस्वर, सुस्पष्ट वाणी ३० वर्षांनंतर पुन्हा कानावर पडणं म्हणजे भगवंताच्या नीतांत कृपेचं प्रमाण! गीतकार व कवी चंद्रशेखर सानेकर सर यांनी स्नेहापोटी माझ्या कविता अत्यंत हृदयस्पर्शी पद्धतशीरपणे उलगडून सांगितल्या, अभिनेत्री श्रीमती मधुरा वेलणकर यांनी 'अनात्म' मधल्या कवितांच्या बहारदार वाचनाने उपस्थितांची मने जिंकून घेतली.

आदरणीय सुजाता सौनिक मॅडम यांनी महिलांनी प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध केले असल्याचे सांगताना कवितेसारख्या एखाद्या कलेची जोपासना महत्त्वाची असल्याचे सांगितले, तर अध्यक्ष म्हणून भाषण करताना नितीन करीर सर यांनी मनुष्य समाजात वावरत असताना अनेक गोष्टी पाहतो, अनुभवतो व विचार करतो. त्याच्या मनात सुरू असलेले विचार कागदावर उतरतात आणि कविता जन्म घेते. यामुळे कविता ही मानवी मनाची अभिव्यक्ती आहे, असे विचार व्यक्त केले. डॉ. मृण्मयी भजक यांच्या समर्पक निवेदनाचा साज कार्यक्रमाला साजेसा असा होता. अशा सुंदर क्षणाचे साक्षीदार होतानाची कृतज्ञता खरंच हृदयात न सामावणारी! या कार्यक्रमाचे चित्रण ग्रंथालीच्या 'ग्रंथाली वॉच' या यु-ट्यूब चॅनलवर https://youtu. be/ mv0eqMmKH8Q या लिंकवर उपलब्ध आहे."







शाळेत आई शिक्षिका होती. आईच्या प्रवासात नेहमी अवांतर वाचनासाठी पुस्तक जवळ असायचं. आपणही मोठं होऊन नोकरीसाठी प्रवास करायला लागलो की, असंच छानसं पुस्तक वाचत प्रवास करायचा, असंही एक मोठं स्वप्न मी लहानपणी पाहिल्याचं आठवतं.

शाळेतली तेव्हाची अभ्यासक्रमाची मराठी भाषेची पुस्तकंही किती दर्जेदार होती. त्यातले धडे आणि कविता आजही आठवतात. दहावीत असताना भावाचं बारावीचं क्रमिक मराठी पुस्तक अवांतर वाचन म्हणून कितीतरी वेळा वाचून काढल्याचं आठवतं.

आम्हा तिन्ही भावंडांचं शिक्षण मराठी शाळेत झाल्यामुळे आमचा परस्पर संवाद व अभिव्यक्ती सकस, सहज, सुंदर होत राहिली असं आज मागे जाऊन विचार करताना वाटतं; पण खऱ्या अर्थाने शाळा अभ्यास, गुण, निकाल, मनोरंजन यांच्या पुढे जाऊन आयुष्यात साहित्य म्हणून पुस्तकांचा खरा परिचय जर कुणी करून दिला असेल, तर तो माझ्या संस्कृतच्या शिक्षिका डॉ. सुनीता पाटील बाईंनी. आजही आठवीत असतानाचा बाईचा वर्ग जसाच्या तसा डोळ्यांसमोर उभा राहतो आणि मन कृतज्ञतेनं भरून येतं. स्वच्छ, स्पष्ट वाणीतून कालिदासाचं 'मेघदूत' आपल्या विद्यार्थ्यांना सांगणाऱ्या, पार्वतीने शिवासाठी केलेली आराधना आपल्या मनोहर आणि रसाळ वाणीतून समजावून देणाऱ्या, तरुण वयातही व्यासंगी आणि विद्वान असं बाईंचं व्यक्तिमत्त्व आणि दीड वर्ष त्यांचा लाभलेला शालेय सहवास हा माझ्या जीवनाला झालेला परीसस्पर्श वाटतो. इयत्ता आठवीत असताना



## वाचत राहा म्हणजे लिहिते व्हाल...

- **वाचत राहा म्हणजे लिहिते व्हाल, असं कुठेतरी वाचलं होतं, याची प्रचिती काही वर्षांपासून जेव्हा आपोआप कविता उमटू लागल्या, तेव्हा आली.**
- **खरं तर तेव्हा खूप अशा कविता वाचून झाल्या नव्हत्या; पण ज्या पद्धतीने एकामागोमाग कविता येत राहिल्या, तो अनुभव इतका नितांत सुंदर सृजनाचं रूप दाखविणारा होता की, आयुष्यातल्या या वळणानं मला अधिकच कृतज्ञ बनवलं.**
- **कवितांची गोडी जीवनात सुंदर रस घेऊन आली. त्यातून ग्रंथाली प्रकाशनकडून 'अनात्म' हा माझा कवितासंग्रह अलीकडे प्रकाशित झाला आहे.**
- **त्यातील मनोगतात मी म्हणल्याप्रमाणे, आयुष्यात रंग रूपाच्या, नात्याच्या, यशाच्या अशा अनेक ओळखी आपल्याला मिळत राहतात; पण 'कवी' म्हणून माझी माझ्याशी झालेली ही ओळख अत्यंत प्रिय आहे.**

आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर अनुभवलेला तो साहित्य सहवास माझ्यासोबत अत्तराच्या सुवासासारखा निरंतर दरवळत राहिला आहे. खरंतर बाईंनी आम्हा सर्व विद्यार्थ्यांचा एकत्रित घेतलेला तो वर्ग; पण माझ्यासाठी त्या क्षणाचं अस्तित्व जणू त्यावेळी त्या आसमंतात सढळ हस्ते ज्ञानदान करणाऱ्या बाई आणि त्या दानाच्या स्वीकारासाठी आसुसलेलं जणू एक कोर करकरीत, रिकामं पात्र झालेली मी या निव्वळ दोन व्यक्तींपुरती भरून राहिलेलं आहे. आयुष्यात काही क्षण खरंच चमत्काराहून वेगळे नसतात, तसाच माझ्या आयुष्यात आलेला हा क्षण मनात साहित्याविषयी प्रचंड कुतूहल व गोडी निर्माण करणारा ठरला, इतका की, आयुष्यात शिक्षण, लग्न, नोकरी या निमित्ताने जागा बदलल्या, आयुष्यातली प्राथम्ये, व्यक्ती, सहवास, परिचित बदलत राहिले; पण हातातलं पुस्तक आणि वाचन आजपर्यंत कधीच सुटलं नाही.

वाचन ही आयुष्यात नेहमीच माझी आवडती आणि जिव्हाळ्याची जागा राहिली आहे. पुढे मुंबई विद्यापीठातून इलेक्ट्रॉनिक्स आणि

टेलिकम्युनिकेशनमधून अभियांत्रिकी पदवी पूर्ण केली; पण तेव्हाही मराठी साहित्य आणि वाचन यांची सोबत निरंतर होती. त्या काळात मुख्यतः आत्मचरित्र वाचण्यात जास्त रस वाटत होता. त्यावेळी बेटी मेहमुदी हिचं 'नॉट विदाऊट माय डॉटर' हे लीना सोहनी यांनी भाषांतरित केलेलं पुस्तक एका संध्याकाळी कॉलेज सुटताना एका मैत्रिणीनं वाचायला दिलं. घरी जाऊन जसं पुस्तक वाचायला हातात धरलं, ते पूर्ण वाचून संपल्यावर कधीतरी रात्री उशिराच हातावेगळं झालं. झपाटून असं वाचून संपवलेलं ते माझं पहिलं पुस्तक असावं.

पुढे कितीतरी दिवस आणि कित्येक वर्षे ते पुस्तक माझ्या मनात घर करून राहिलं, इतकं की, मी पुढे बृहन्मुंबई महानगरपालिकेत इंजिनीअर म्हणून नोकरीला लागल्यानंतर माझ्या पहिल्या पगारातून घेतलेल्या पुस्तकात 'मौनाची भाषांतरे' हा संदीप खरेंचा कवितासंग्रह आणि 'नॉट विदाऊट माय डॉटर' या पुस्तकाने पहिला नंबर लावला. पुढे ते पुस्तक जसंच्या तसं पोहोचलंय ना, याची खात्री करण्यासाठी मी ते पुस्तक इंग्रजीतूनही वाचलं. हॉलिवूडमध्ये त्यावर आलेला सिनेमाही आवर्जून शोधून पाहिला.




पुस्तकांशी एकात्मता अशी की 'वाचणं हा माझा छंद आहे' असं कुणाला सांगितल्याचं मला तरी आठवत नाही, कारण वाचन हा माझाच एक भाग होता, ती माझ्याहून वेगळी अशी बाब कधी नव्हतीच मुळी! मात्र या आवडीमुळेच मला स्वतःच्या एकांतात, पुस्तकांच्या चिंतनात तासन्तास रमणे, ही तर माझ्यासाठी एक सहज आनंदाची गोष्ट होऊन बसली. त्यामुळेच की काय, पुढे विपश्यनेचा एकांतपणासुद्धा मला खूप आवडू लागला, जगण्याचा सहज भाग होत गेला. एका वेगळ्या वाटेनं जायचं म्हणून महाराष्ट्र नागरी सेवेचा जेव्हा विचार केला, तेव्हा परीक्षेचे स्वरूप, अभ्यासक्रमातली विविधता, समग्रता आवडून गेली. त्या काळातही वेगवेगळ्या स्वरूपाचं वाचन होत गेलं. विशेषः इतिहास आणि थोर व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाने विशेष गारूड घातलं. त्यावेळी पहिल्यांदा दादर येथील मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाला भेट दिल्याचं आठवतं; पण अभ्यासादरम्यान केलेल्या वाचनामुळे माझ्या व्यक्तिमत्त्वात निश्चितच सकारात्मक बदल झाले. याच काळात आचार्य ओशो रजनीशांचं 'शिक्षा और क्रांती', 'विद्रोह', 'स्त्री आणि क्रांती' अशी काही मूलगामी विचार करायला लावणारी पुस्तकंही वाचनात आली. प्रचंड तर्कांनी भरलेली ही पुस्तकं वाचताना मनाला आणि बुद्धीला पोषक खाद्य मिळत राहिलं जीवन अधिकाधिक समृद्ध होत राहिलं.



वाचनाचा हा प्रवास निरंतर चालू राहताना त्यात उत्तरोत्तर अधिकच वेग आणि झपाटलेपण येत जातं, असा माझा अनुभव. सध्या एस. एन.डी.टी. विद्यापीठातून मराठी साहित्यामधून मास्टर्स करत आहे त्यातलं विषयांचं वैविध्य, भाषेचे साहित्य आणि संस्कृतीच्या इतिहासाचा अभ्यास करताना मनस्वी आनंद वाटतो, त्याचबरोबर स्त्री साहित्याचा अभ्यास करताना वेगवेगळ्या साहित्यकृतीचा आस्वाद घेताना निराळीच मौज वाटते. सिमॉन द बोव्हार (सेकंड सेक्स), शांता गोखले (एक पाय जमिनीवर) मेधना पेठे (आंधळ्यांच्या गाई) अशा विविध साहित्यकृती एकामागोमाग वाचताना आयुष्याचा समग्र विचार करण्याची वृत्ती वाढली आहे. तरुण नवीन लेखकांमध्ये डॉ. ऐश्वर्या रेवडकर यांची 'बिहिरीची मुलगी' ही कादंबरी आणि प्रचंड अभ्यास करून उतरवलेल. डॉ. सुनंदा भोसेकर यांचं 'पेरिप्लस ऑफ हिंदुस्थान' हे पुस्तक वाचतानाही असाच अनुभव येतो. हा वाचनप्रवास पुढे निरंतर मनोहर होत राहील, याची शाश्वती वाटते. जीवनात असा निर्भेळ आनंद पेरणाऱ्या पुस्तकांना माझा मनस्वी सलाम...

*(अमृतवेल – ऑनलाइनवरून साभार)*

**(उपसचिव, महाराष्ट्र शासन.)**

# मना सज्जना

**रेश्मा घाणेकर**

मानसिक आरोग्य म्हणजे मनाचे आरोग्य. कोठे असते हे मन? मन या विषयावर विचारवंत, संत, शास्त्रज्ञ सर्वजणांनी आजपर्यंत खूप मंथन केले आहे. माणसाने कसे वागावे हे सांगण्यासाठी संत रामदासांनी मनाचे श्लोक लिहिले. परदेशातही फ्रॉइडसारख्या विचारवंताने बरेच लेखन केले. एडवर्ड बोनोने ही विचारप्रक्रिया उलगडली जी आजही मार्गदर्शक ठरते.


नुकतेच मी एक मनोविकार या विषयावर पुस्तक वाचले. नाव होते मनोविकारांचा मागोवा. प्रत्यक्ष रुग्णांच्या कथा (case studies) सांगून त्यात वेगवेगळे विकार उलगडले होते. निम्याहून अधिक पुस्तक वाचल्यावर मला जरा काळजी वाटू लागली. कारण त्यातील काही विकारांची लक्षणे माझ्या परिचितात मला आठवायला लागली. बापरे! म्हणजे ते सुद्धा...? असा प्रश्न मला पडू लागला. बहुसंख्य लोक वेड, वेडा, वेडसर या शब्दाला भितात; पण खरंच मानसिक आजार, वेडेपण या गोष्टीला हेटाळणीने पाहावे का? माझे पुण्यातील कार्यालय कोठे आहे हा प्रश्न अनेक जण विचारत. येरवडा हे नाव कळले की एखादा परिचित गमतीने म्हणायचा... बापरे! म्हणजे एकीकडे मनोरुग्णालय, एकीकडे तुरुंग आणि त्याच रांगेत तुमचे कार्यालय? हैं हैं हैं...

मनात यायचे मनोरुग्णालयातही मनोरुग्णांवर इलाज होतात मग मनोरुग्ण किंवा जनसामान्यांच्या भाषेत वेडा या शब्दाला इतके हेटाळणीने का पाहिले जाते? उच्च रक्तदाब, मधुमेह हे जसे ताणातून उद्‌भवतात, तसेच मनोविकारसुद्धा तणावातून निर्माण होऊ शकतात. एका विशिष्ट क्रमाच्या अतिरेकी सवयीतून किती तरी जणांना Obsessive Compulsive disorder (OCD) हा विकार असलेला आढळतो. त्यामुळेच Mental disorder याविषयी अजून सहृदयतेने पाहायला हवे असे वाटते.

### मानसिक आरोग्याची व्याख्या पाहिली तर,

Mental State is a state of well being that allow people to cope with life's stresses. It is the capacity of every individual to feel, think and act in ways that enhance their ability to enjoy life and deal with challenges.

मग हे आरोग्य बिघडते ते कशाने? अध्यात्मात षड्‌विकार हे मन:स्थिती बिघडवतात असे सांगितले आहे. षड्‌विकार म्हणजे काम,



सिगमंड फ्रॉइड



क्रोध, मद, मोह मत्सर इत्यादी. भगवद्‌गीतेमध्ये क्रोधाला सर्वात जास्त शत्रू मानले आहे.

*क्रोधात्भवति संमोहः*
*संमोहात्स्मृतिविभ्रम:।*
*स्मृतिभ्रंशादबुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ।*
*–गीता २.६३*

आजकाल धकाधकीचं जग आहे. प्रत्येक क्षेत्रात स्पर्धेचं युग आहे. वेगवेगळी धास्ती घेऊन आपण वावरतो. मुलांना त्यांच्या आवडत्या विषयात शिक्षण घेण्याची मुभा आपण देत नाही, कारण त्यामुळे त्यांचे भविष्य सुरक्षित होईल का, असे विचार आपल्या मनात येतात, तर मुलांना नावडत्या विषयात प्रगती करता आली नाही की, लहान वयात ताण नैराश्य हे विकार जडतात. शिक्षण झाल्यावरही नोकरी लागण्याची, स्पर्धेत टिकून राहण्याची, पुढे जाण्याची शर्यत एखाद्याला पेलवत नाही. मग घरच्यांचा दबाव वाढतो. इतरांसोबत सारखी बरोबरी केल्याने त्याला आपले अस्तित्व शून्य वाटू लागते किंवा तो मग असूयेने दुसऱ्याच्या यशात न्यून शोधायला लागतो. दोन्हींचा परिणाम मनोविकारच.

कोणत्याही पद्धतीने यश मिळाले पाहिजे, या एकाच विचाराने माणूस स्वतःच्या मार्गावर विश्वास ठेवण्यापेक्षा दुसऱ्याचं काय चालू आहे, याकडे लक्ष द्यायला लागतो. स्वतःच्या कमतरता सुधारण्यापेक्षा दुसऱ्याच्या यशाची निंदा करू लागतो.

हा विकार काही गरीब श्रीमंत यशस्वी–अयशस्वी, शहर, खेडे असा भेद करत नाही. अत्यंत प्रसिद्ध अभिनेता, अभिनेत्री आपल्याला नैराश्य विकाराचा सामना करावा लागतो आहे अशी कबुली देतात. म्हणजे सर्व सुखे हात जोडून उभी असलेल्या किंवा प्रसिद्धीच्या शिखरावरच्या व्यक्तीपर्यंत या विकाराची व्याप्ती पोचली आहे. Social Media चा अतिरेकी वापर हासुद्धा मानसिक आरोग्य बिघडवू शकतो.

चित्रपट, साहित्य या माध्यमातही थोड्या लोकांनीच हा विषय मांडला आहे. रात और दिन हा स्किझोफ्रेनियाच्या रुग्णांची गोष्ट सांगतो, तर खामोशी हा चित्रपट मनोरुग्णावर इलाज करताना भ्रमिष्ट झालेल्या नर्सची गोष्ट सांगतो. पेडगावचे शहाणे ते देवराई, लेथ जोशी इ. मराठी चित्रपटातही मानसिक आरोग्याचे प्रश्न उलगडले आहेत.

हे आरोग्य शाबूत ठेवायचे असेल तर आधी शारीरिक तंदुरुस्तीकडे लक्ष दिले पाहिजे कारण शरीर तंदुरुस्त तर मन तंदुरुस्त, आपल्या सर्वांना अपयश पचवायला लहानपणापासून शिकायला पाहिजे. अमिताभ बच्चन यांच्या वडिलांनी त्यांना दिलेला *मन का हो तो अच्छा, ना हो तो और भी अच्छा* हा मंत्र आपण आपल्या पुढच्या पिढीला दिला पाहिजे.

लहान मुलांमध्ये मानसिक आरोग्य उत्तम असते कारण ती निरागस असतात आणि त्यांना हसायला कारण लागत नाही. त्यामुळे हसता न येणाऱ्यांसाठी आजच्या काळात हास्य क्लबची गरज आहे.

चिंता ही गोष्ट दूर ठेवायची तर चार जवळचे आप्त मित्र मैत्रिणी जोडले पाहिजेत. त्यांच्याशी मन मोकळे केले, तर ताण नक्कीच येणार नाही. कवीच्या शब्दात बोलायचे तर,


*चलो कुछ पुराने दोस्तो के*
*दरवाजे खटखटाते है।*
*देखते है उनके पंख थक चुके*
*या अभि भी फडफडाते है।*
*हंसते है खिलखिलाकर या*
*होट बंद कर मुस्कुराते है।*
*बताते है सारी आपबीती या*
*सिर्फ सफलताए सुनाते है।*

यशाचे सोपान चढताना जर आपले मानसिक आरोग्य सांभाळायचे असेल, तर स्व. अटलबिहारी वाजपेयी यांचे शब्द लक्षात ठेवले पाहिजे. त्यांच्या कवितेत ते म्हणतात,

*परिवेश से पृथक,*
*अपनों से कटा–बेटा,*
*शून्य में अकेला खड़ा होना,*
*पहाड़ की महानता नहीं,*
*मजबूरी है।*
*जरूरी यह है की,*
*ऊँचाई के साथ विस्तार भी हो,*
*जिससे मनुष्य,*
*ठूंठ सा खड़ा न रहे,*
*औरों से घुले–मिले,*
*किसी को साथ ले, किसी के संग चले।*
*मेरे प्रभु!*
*मुझे इतनी ऊँचाई कभी मत देना,*
*औरों को गले न लगा सकूँ,*
*इतनी रुखाई कभी मत देना।*

**(अपर राज्यकर आयुक्त, मुंबई, महाराष्ट्र शासन.)**

# नागझिऱ्याची प्रेमकथा



**अजय भोसले**

पावश्या, सनबर्ड, तांबट अशी पक्ष्यांची नावं कधी ऐकली आहेत का? सलीम अली, मारुती चितमपल्ली यांच्या पुस्तकांतून पक्ष्यांची चित्रं जरुर पाहिली होती. काही वाचलं होतं. प्रत्यक्ष पाहिलं काहीचं नाही..चिमण्या, कावळे तेवढे...चिमण्याही येत नाही हल्ली अंगणात. कावळा श्राद्धाला आला तर येतो...तेवढंच...सिमेंटच्या जंगलात पाखरांचे आवाज हरवून बसली आहेत माणसं...कवितेतील हिरवे हिरवे गार गालीचे कवितेतच राहिले आहेत. आई, बाबा त्यांच्या फुलराणीला ते कुठून दाखवणार? निमग्न, निरव शांततेचा निसर्ग शहराच्या कोलाहलात कुठे गवसणार? असे असंख्य प्रश्न, नागझिऱ्याची प्रेमकथा ही फिल्म पाहताना मनात येत होते.

पाखरांचं संगीत....संगीतकार निसर्ग...सगुणातून निर्गुणकडे नेणारा निसर्गाचा स्वनिर्मित षड्ज....षड्जातून निषादाकडे नेणारी धीरगंभीर शांतता....फक्त नि...नि...सूर...स्वत्व, मानसिक कोलाहल शून्य करून अंतर्मनाचा शोध घेण्यास भाग पाडणारी शांतता....या शांततेत पक्ष्यांचा किलबिलाटही एकरूप होऊन जातो. हरणांच्या शिंगांच्या टकरीतून निर्माण होणारा ध्वनी निरव शांततेच्या पार्श्वभूमीवर कानाला सुखावतो. हा ध्वनीही नादमय भासतो निसर्ग....सर्व ध्वनी...कोलाहल त्याच्या गर्भात सामावून त्याचा स्वनिर्मित ताल निर्माण करतो.

पक्ष्यांचे ध्वनी कुठल्याही लिपीत व्यक्त करता येत नाहीत. किकांना मात्र त्यांची भाषा समजते. ते चक्क त्यांच्याशी त्यांच्या भाषेतून संवाद साधतात. किका म्हणजे किरण पुरंदरे....सखा नागझिराचे लेखक. आम्ही सिमेंटच्या जंगलातील माणसं....मॉल, होटेल, सिनेमा, पार्टी हे आमच्या जीवनाचे घटक. अन् या घटकाभोवतीच फिरत असतं आयुष्य. एकरेषीय... एखाद्या वेळेस निघतोही निसर्गाकडे....मग पाहिला-पाहिला म्हणून ओठाचे चंबू करून आपलेच काढलेले फोटो. मोबाइलमध्ये बंदिस्थ करून परततोही...निसर्गाचा पूर्ण आस्वाद न घेता..

आपला परीघ विस्तारण्यासाठी आणि हे सर्व अनुभवण्यासाठी तुम्हाला जंगलातच जावं लागेल. त्यासाठी वेगळीच आसक्ती लागते. या आसक्तीमुळेच पुण्यातील एक जोडपं सर्व भौतिक सुखाचा त्याग करून नागझिऱ्याच्या जंगलात स्थायिक झालं. जंगलाच्या प्रेमातच पडलं. कारण हे सर्व स्वत: अनुभवणं ही एक वेगळीच अनुभूती असते. निसर्गाच्या समीप राहू पाहणाऱ्या आरतीने हा सुंदर निसर्ग टिपला आहे, तितक्याच स्वमग्नतेने....तन्मयतेने.. तिचं निसर्गप्रेम तिच्या कवितांतून व्यक्त होतच असतं....ते तितक्याच सहजतेने कॅमेऱ्यातूनही चित्रित होतं.

निसर्गाचं नितळ स्वरूप साध्या मोबाइल/कॅमेरातच सुंदर येतं. याचं कारण त्याला शहराच्या प्रदूषणाची न झालेली लागण. विषाणू संसर्ग वगैरे शहरी चोचले आहेत. निसर्ग आपल्या मस्तीत मस्त असतो. निसर्गाला सजवावं लागत नाही. तो नव्या नवरीसारखा विविध अलंकार लेऊन नेहमीच नटलेला असतो. फक्त क्लोजप, झूमसाठी तुम्हाला महागड्या सामग्रीची आवश्यकता भासेल आणि केवळ हे सर्व असलं म्हणजे तुमच्या फ्रेममधून तुम्ही निसर्ग समोरच्याच्या मनावर ठसवू शकता असंही नाही. त्याकरिता वेगळ्या परिप्रेक्ष्यातून निसर्गाकडे पाहावं लागतं. वेगळी दृष्टी लागते. हे सर्व आरतीकडे आहे. ती तिच्या फ्रेम्समधून एक कहाणी निर्माण करते.

सुरुवातीला निसर्गातील स्तब्धता, मग पक्ष्यांची भाषा, पाणथळीची जागा अशा चौकटीतून निसर्ग हळुवार उलगडत जाते.संयतपणे...

पाखरांचे आवाज ऐकायचे तर झाडे लावायला हवी. शहरात झाडांची अडचण होते. निसर्गाच्या प्रेमात आकंठ बुडालेले किका...त्यांची पत्नी... किती उत्साहाने भारल्यासारखे वाटतायेत....लहान मुलांच्या संगतीने टवटवीत...जागतिक वन दिनाच्या निमित्ताने ही फिल्म तुमच्या भेटीला आलीय. जंगलात जाता नाही आलं, तर निदान फिल्ममधून निसर्ग अनुभवा...

**संदर्भ : १) नागझिऱ्याची प्रेमकथा आरती कुलकर्णी यांची फिल्म**
**https://www.youtube.com/watch?v=KbZPDT-79Vct=4s**

**(अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन.)**

*(सोयरे माझे फार थोर होते*
*काही चोर अन काही दरोडेखोर होते*
*– सुरेश भट*
सुरेश भटांच्या वरील ओळी सकाळी ऐकल्या अन्
मग आता सहजच सुचले ते लिहिले...)
मित्र माझें फारफार थोर होते
काही पाण्याने धुंद तर
काही बुधला संपूनही स्थिर होते !!
काही जग जिंकूनही अस्वस्थ होते
अन् काही जग हरूनही मस्त होते !!
कसे जपून ठेवू म्हणून काही चिंतेत होते,
तर आज उधळून टाकावया
न उरले काही
म्हणून काही बैचेन होते !!
त्यांची अमिरी त्यांनाच शोभे
अनेकांची फकिरी चमकून येतसें !!
मैफिलीत जे रमले तेच आमचे यार होते
बाकी फक्त सह वाटकरी होते !!

**– सतीश जोंधळे,**
**सहसचिव, महाराष्ट्र शासन.**




## संध्याकाळ

भळभळत्या जखमा खोल
अन् माशांचे मोहळ
कळकट्ट जिणे उशाला
खाली घामाचे ओघळ..

अंगांग कुरतडलेले
गंजके रक्त ओहोळ
रणरणत्या उष्ण वाळूत
कुबडा उंट घायाळ..

नांगरणी खोल मेंदूची
उठत्या उष्णशा वाफा
दारातही माझ्या काय
एकाकी सडका चाफा..

थांबले श्वास एकांती
सूर्याच्या मलूल धापा
वसतीला आला माझ्या
दुःखाचा भटका ताफा..

**– विवेक दहिफळे,**
**सहसचिव, महाराष्ट्र शासन.**

## जाणीव

दुसऱ्यांच्या दुःखातच सुख शोधणारे
व त्यातच समाधान मानणारे मला भेटले
आनंद साठवता येत नाही म्हणून
तो मुक्तपणे उधळणारेही मला भेटले
दिव्यांगाकडे बघून प्रेरणा घेणारेही मला भेटले
ईश्वर वृद्धापकाळात दृष्टी, कर्णेन्द्रीये व स्मृती अधू
झालेले तरीही यथेच्छ आनंदी मी पाहिले
माणसाबरोबरच त्यांचे जग संपते याचीही जाणीव
त्यांना आहे.


**– डॉ. रमेश नारायण,**
**निवृत्त महसूल अधिकारी, महाराष्ट्र शासन.**


## अंतरंग

कधी-कधी नभात पाहताना
उगाचंच वाटतं हा निळा तर ओळखीचा
अंगाअंगात भिनलेला, मनकोन्यात झिरपलेला...
मात्र, त्याच्या अंतरंगाचा शोध घेताना
पार दमछाक होते...
शोध लागतंच नाही खोलवर ...अनंतापर्यंत...

**– अजय भोसले,**
**अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन.**

# रंगसंगती सुलेखन भाग – ७












(सुलेखनकार : अजय भोसले, अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन.)

# जावे विनोदाच्या गावा : विधिमंडळातील एक अविस्मरणीय क्षण!

**प्रदीप जेठवा**

'जावे विनोदाच्या गावा' ही म्हण आपण अनेकदा हलक्या-फुलक्या अर्थाने वापरतो; पण कधी-कधी जीवन आपल्याला अशा ठिकाणी नेऊन उभं करतं, जिथे विनोद, विचार आणि जबाबदारी तिन्हींचा सुंदर संगम अनुभवायला मिळतो. आजच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मला असाच एक विलक्षण अनुभव घेता आला.

महाराष्ट्रातील अमरावती या जिल्ह्यात शिक्षण घेतलेला एक सामान्य घरातील विद्यार्थी सन १९९६ मध्ये महाराष्ट्राच्या मुख्यालयात कर्तव्यार्थ रुजू होतो आणि आजतागायत सामान्य जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळवून देणाऱ्या कार्यालयात खारीचा वाटा उचलतो, याचा मला खरंच अभिमान आहे. आतापर्यंत मी अनेक अधिवेशनात सभागृहात बसून सभागृहातील माहिती संकलित करून मा. उपमुख्यमंत्री महोदयांपर्यंत संबंधित वरिष्ठ अधिकारी यांच्यामार्फत पोहोचवली, परंतु विद्यमान आमदार महोदयांसमवेत त्यांच्या बाजूला बसून 'जावे विनोदाच्या गावा' या कार्यक्रमाचा आनंद घेणे हा माझ्यासाठी अभूतपूर्व योग होता.



महाराष्ट्र विधानमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात वि.स. पागे सभागृह येथे माननीय विधानसभा सदस्य व इतर मान्यवरांसोबत सभागृहात बसून प्रत्यक्ष कार्यक्रम पाहताना मनात अनेक भावना दाटून आल्या. टीव्हीवरून पाहिलेलं विधिमंडळ आणि प्रत्यक्ष अनुभवलेलं विधिमंडळ यात जमीनअस्मानाचा फरक असतो. तसेच गॅलरीमध्ये बसून मा. आमदार महोदय यांनी सभागृहात उपस्थित केलेल्या मुद्यांचे टिपण घेणे तथा विद्यमान आमदारांसोबत मा. मुख्यमंत्री महोदय, मा उपमुख्यमंत्री महोदय यांच्यासमवेत सभागृहात मान्यवरांचे मराठी भाषेच्या अस्मितेचे किस्से ऐकणे, यात जमीन अस्मानचा फरक आहे.

सभागृहात प्रवेश करताच जाणवलं की, येथे प्रत्येक शब्दाचं वजन आहे, प्रत्येक हास्यालाही संदर्भ आहे आणि प्रत्येक क्षणामागे राज्याच्या भवितव्याची छाया आहे. विनोदाच्या कार्यक्रमातही राजकारणाची शालीनता आणि सभागृहाची प्रतिष्ठा जपली जात आहे. विनोद हा फक्त हसण्यासाठी नसतो, तो समाजातील विसंगती दाखवण्यासाठी असतो, हे तिथे प्रकर्षाने जाणवलं.

माझी मातृभाषा गुजराती; पण कर्मभाषा मराठी. माझं दहावीपर्यंतचं शिक्षण मराठी भाषेतील आहे. घरात गुजराती, बाहेर मराठी अशा द्विभाषिक संस्कारात वाढलेला मी मंत्रालयातील एक अधिकारी; पण आज महाराष्ट्राच्या विधिमंडळात बसून कार्यक्रम अनुभवताना भाषेच्या सीमा विरघळल्या. मराठीतील प्रत्येक संवाद, प्रत्येक टाळी, प्रत्येक मिश्कील टिप्पणी मनापासून दाद देण्यासारखी होती. प्रत्येक क्षणी वाटलं होतं, हीच खरी महाराष्ट्राची ताकद! विविध भाषांचा सन्मान करत, सगळ्यांना सामावून घेणारी ही महाराष्ट्राची परंपरा आहे.

विद्यमान आमदारांसोबत बसून कार्यक्रम पाहण्याचा अनुभव तर अभूतपूर्वच. सामान्य नागरिक म्हणून आपण जे प्रश्न बाहेरून पाहतो, तेच प्रश्न आतून कसे मांडले जातात, याचा प्रत्यय अनेक अधिवेशनाच्या काळात मला आला होताच. राजकारण म्हणजे फक्त वादविवाद नाही, तर त्यात समन्वय, संयम आणि कधी कधी विनोदाचाही शिडकावा असतो, त्याचे प्रत्यक्ष उदाहरण आज पाहायला मिळाले.

'जावे विनोदाच्या गावा' म्हणताना आपण हसण्याचा गाव शोधतो; पण आज लक्षात आलं की, लोकशाहीचं खरं गाव इथेच आहे. जिथे मतभेद आहेत; पण मनभेद नाहीत. जिथे टोले आहेत; पण तेही लोकहिताच्या चौकटीत आणि जिथे विनोदही राज्यकारभाराच्या गंभीरतेला पूरक ठरतो.

हा अनुभव केवळ कार्यक्रम पाहण्यापुरता मर्यादित नव्हता. तो लोकशाहीच्या हृदयाचा ठोका जवळून ऐकण्याचा क्षण होता. गुजराती मायबोली असलेला एक अधिकारी म्हणून महाराष्ट्राच्या विधिमंडळात बसण्याचा सन्मान हा माझ्यासाठी आयुष्यभर जपून ठेवावा, असा ठेवा आहे.

खरंच, कधी-कधी विनोदाच्या गावी गेलं की, जीवनाचं गांभीर्य अधिक चांगलं समजतं आणि आजचा दिवस हा त्याचाच साक्षीदार ठरला.

**(विशेष कार्य अधिकारी, मा.उपमुख्यमंत्री कार्यालय, महाराष्ट्र शासन.)**

# रंगांच्या विश्वात हरवलेला क्षण!

**संजीवनी जाधव-पाटील**

कला ही केवळ रंगांची किंवा रेषांची मांडणी नसते; ती कलाकाराच्या मनातील भावविश्वाची सजीव अभिव्यक्ती असते. अलीकडे एका चित्रप्रदर्शनाला भेट देण्याचा योग आला आणि त्या प्रदर्शनात अकोल्याचा सुपुत्र, दिव्यांग चित्रकार वैभव तानाजी सांगळे यांच्या चित्रांनी मन अक्षरशः मोहित करून टाकले. त्यांच्या चित्रांमध्ये उमटलेले जिवंत भाव, रंगांची सूक्ष्म मांडणी आणि जीवनाचे वास्तवदर्शी दर्शन पाहताना मन क्षणभर त्या रंगांच्या विश्वात हरवून गेले.

जन्मतः कर्णबधिर असतानाही अथक जिद्द, चिकाटी आणि कलेवरील नितांत प्रेम यांच्या जोरावर वैभव सांगळे यांनी चित्रकलेच्या क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. प्रदर्शनात मांडलेली त्यांची चित्रे पाहताना प्रत्येक रंगरेषा ही त्यांच्या संघर्षमय प्रवासाची साक्ष देत असल्याची जाणीव होत होती. त्यांच्या चित्रांमध्ये केवळ सौंदर्य नाही, तर भावनांची आणि अनुभवांची एक समृद्ध दुनिया सामावलेली आहे.



वैभवचा जीवनप्रवास हा संघर्षातून उभा राहिलेल्या जिद्दीचा प्रेरणादायी अध्याय आहे. जन्मतः ऐकू आणि बोलू न शकणाऱ्या या कलाकाराने आपल्या आई-वडिलांच्या अथक प्रयत्नांमुळे आणि स्वतःच्या कष्टाच्या जोरावर संवादाची दारे उघडली. वयाच्या चौथ्या वर्षी त्याला श्रवणयंत्र देण्यात आले आणि स्पीच थेरपीच्या माध्यमातून त्याला बोलण्याचा सराव करून घेण्यात आला. विशेष म्हणजे त्याच्या वडिलांनी स्वतः स्पीच थेरपी शिकून मुलाच्या घडणीत महत्त्वाची भूमिका बजावली.

याच काळात त्याच्या हातात पेन्सिल आणि रंगांचा ब्रश देऊन चित्रकलेची आवड निर्माण करण्यात आली. त्या छोट्या हातांनी काढलेल्या रेषांनी पुढे एक विलक्षण कलायात्रेने आकार घेतला. शालेय जीवनात अनेक अडचणी आणि टिंगलटवाळी सहन करतही वैभवने आपला आत्मविश्वास कायम ठेवला. त्याच्या वडिलांनी त्याला भाषणे लिहून दिली, लोकांसमोर उभे राहण्याचा सराव करून घेतला आणि समाजात आत्मविश्वासाने वावरण्याची ताकद दिली.

वैभवच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा क्षण आठवीत असताना घडला. कानाच्या तपासणीसाठी मुंबईला गेल्यावर त्याचे वडील त्याला सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्स या प्रतिष्ठित कला संस्थेत घेऊन गेले. त्या संस्थेचे दर्शन होताच वैभवच्या मनात कलेचे स्वप्न रुजले. वडिलांनी त्याला सांगितले की, येथे प्रवेश मिळाला तर आयुष्य उजळून जाईल. त्या शब्दांनी प्रेरित होऊन त्याने त्या संस्थेत शिक्षण घेण्याचा निर्धार केला.

पुढे दहावी आणि बारावीमध्ये उत्तम यश संपादन करून चित्रकलेच्या सीईटी परीक्षेत दिव्यांग गटातून प्रथम क्रमांक मिळवत त्याने सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्स, मुंबई येथे प्रवेश मिळवला. तेथून त्याने बी.एफ.ए. (अप्लाइड आर्ट) ही पदवी संपादन केली. इंद्रायणी मतिमंद शाळेपासून ते जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्सपर्यंतचा त्याचा प्रवास हा संघर्ष, जिद्द आणि स्वप्नपूर्तीचा प्रेरणादायी प्रवास आहे.

प्रदर्शन पाहताना त्यांच्या चित्रांची वैशिष्ट्ये प्रकर्षाने जाणवत होती. पोर्ट्रेट्समधील जिवंत भाव, निसर्गचित्रांतील शांतता, ग्रामीण जीवनाचे वास्तवदर्शी चित्रण, वारली शैलीतील सर्जनशीलता आणि पेन्सिल पोर्ट्रेटमधील सूक्ष्म रेखाटन, या सर्वांनी मनाला भुरळ घातली. प्रत्येक चित्रात कलाकाराच्या भावविश्वाची खोल जाण आणि जीवनाकडे पाहण्याची संवेदनशील दृष्टी स्पष्टपणे जाणवते.

आज वैभवच्या कलेने देशाच्या सीमा ओलांडल्या आहेत. इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, जर्मनी, रशिया आणि फ्रान्स या देशांमध्ये त्याच्या चित्रांनी स्थान मिळवले आहे. मुंबईतील अमेरिकन दूतावासातही त्याच्या चित्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. भारत सरकारच्या 'दिव्य कला मेला' या राष्ट्रीय प्रदर्शनातही त्याने सहभाग नोंदवला असून दिल्ली, मुंबई, भोपाळ, गोहाटी, जयपूर, इंदूर, वाराणसी आणि बेंगळुरू अशा अनेक शहरांत त्याच्या कलाकृतींनी रसिकांचे लक्ष वेधले आहे.

वैभवच्या यशामागे त्याच्या कुटुंबाची अमूल्य साथ आहे. आई-वडिलांचे अथक प्रयत्न, भावाचे मार्गदर्शन, गुरुजनांचे आशीर्वाद आणि मित्रपरिवाराचे प्रोत्साहन यामुळेच ही यशोगाथा घडली आहे. त्याच्या नम्र स्वभावातून आणि कलेतील प्रामाणिकतेतून ही जाणीव स्पष्टपणे दिसून येते. या प्रदर्शनातून बाहेर पडताना मनात एकच विचार घोळत राहिला-कलेला कोणत्याही मर्यादा नसतात. शरीराला मर्यादा असू शकतात; परंतु प्रतिभेला आणि स्वप्नांना सीमा नसते. वैभव सांगळे यांच्या चित्रांनी केवळ कॅनव्हास रंगवले नाहीत; त्यांनी रसिकांच्या मनातही प्रेरणेचे रंग कायमचे उमटवले आहेत.

म्हणूनच ठामपणे म्हणावेसे वाटते की, या दिव्यांग चित्रकाराच्या प्रतिभेने रंगांना शब्द दिले आणि संघर्षाला सौंदर्याची एक अद्भुत अभिव्यक्ती दिली.

**(माहिती अधिकारी, कोकण विभाग, नवी मुंबई, महाराष्ट्र शासन.)**

**निसर्गसौंदर्याच्या शोधात राज्याबाहेर किंवा परदेशगमन करण्याचा कल मोठ्या प्रमाणावर वाढला आहे; पण कधी आपल्या नजीकच्या परिसरातच फार मोठं निसर्गसौंदर्याचं भांडार असतं आणि आपण त्यापासून अनभिज्ञ असतो, असाच अनुभव भंडारदरा धरण आणि परिसराच्या पर्यटनातून आल्यावाचून राहत नाही. भंडारदरा परिसर आणि बॅक वॉटरची साधारणत: ४० कि.मी.ची परिक्रमा म्हणजे निसर्गसौंदर्याच्या सर्वच रूपांचे देखणे मूर्तिमंत रूप. येथे आल्यावर 'काखेत कळसा आणि गावाला वळसा' ही म्हण आठवल्याशिवाय राहणार नाही. एकदा या परिसराची परिक्रमा केली की, स्वस्त आणि मस्त पर्यटन आपल्या गावापासून फार जवळ असल्याचा तुम्हाला अनुभव येईल.**

# निसर्गरम्य भंडारदरा!

**अजित देशमुख**

माझा अकोले तालुका (जि. अहमदनगर) हा निसर्गसौंदर्याने नटलेला तालुका आहे. भंडारदरा-हरिश्चंद्रगड परिसर म्हणजे पृथ्वीवरचा अक्षरश: स्वर्गच! या परिसरात विशेषत: पावसाळ्यातील दृश्य फार विलोभनीय असते. आकाशाला भिडणारी पर्वतांची उंचशिखरे, पावसाळ्यात बेहोशपणे झेपावणारे जलप्रपात हे याच परिसरात आहे. ठिकठिकाणी दिसणारे धबधबे, हिरवा शालू परिधान केलेली रानसम्राज्ञी, इटुकल्या-पिटुकल्या सोनकीसारख्या रानफुलांचा पुष्पोत्सव, रुंजी घालणाऱ्या फुलांना बिलगणाऱ्या मधमाशा, पक्ष्यांचे मधुर स्वर, हिरव्यागार गवताने झाडांनी सजलेले डोंगर, निर्झरांचे मंजुळ गाणे, धरणीमातेचा देखणा शृंगार या सर्व निसर्गसौंदर्याचे ओतप्रोत दर्शन म्हणजे सृष्टीला पडलेले सुंदर स्वप्नच जणू!

भंडारदरा धरण हे ब्रिटिशकालीन स्थापत्यसौंदर्याचा अद्‌भुत नमुना आहे. वाळू, सिमेंटऐवजी पूर्णत: दगड व चुनखडीत १९२५ साली बांधलेले हे समुद्रसपाटीपासून राज्यातील सर्वात उंचीवरचे धरण आहे. बहुतांश पर्यटकांना भंडारदरा धरण, अम्ब्रेला व रंधा फॉल यापुरतीच या परिसराची माहिती आहे; परंतु याहीपेक्षा निसर्गसौंदर्याची मुक्त उधळण आहे, ती भंडारदराच्या ४० कि.मी.च्या बॅक वॉटर परिसरात. भंडारदरा भिंतीपासून मागे २० कि.मी. धरणाचे पाणी पसरलेले आहे. भिंतीपासून निघून पुन्हा भिंतीकडे येणारी ४० कि.मी.ची परिक्रमा म्हणजे निसर्गसौंदर्याच्या विविध आविष्कारांचा मनोहारी साक्षात्कार आहे. धरणाच्या भिंतीच्या समोर असलेल्या अम्ब्रेला फॉलवरून फेसाळत कोसळणारे पाण्याचे दृश्य हे मनाला भुरळ पाडते. राज कपूरसारख्या कलेच्या उपासकाने म्हणूनच उत्तराखंडच्या गंगोत्रीचा परिसर 'राम तेरी गंगा मैली' या चित्रपटातील काश्मीर येथेच साकारला होता. जवळच हजारो मीटर खोल दरीत कोसळणारा रंधा फॉल आणि तेथील पर्यटन सुविधा हे एक निसर्गसौंदर्याचे अद्‌भुत प्रतीक आहे. राज्यातील सर्वोच्च उंचीचे (१,६४६ मी.) कळसुबाईचे शिखर येथून जवळच आहे. शिखरावर जाण्याचा आणि तेथून नयनरम्य परिसर टेहळण्याचा आनंद काही औरच.

## सदाहरित सह्याद्री

भंडारदरा धरणाच्या भिंतीच्या डाव्या बाजूने सुरुवात केली की, दर्शन होते ते भंडारदरा जलाशयात अथांग पसरलेले निळेशार पाणी, सभोवताली हिरव्या पाचूंनी नटलेली सदाहरित, आकाशाला गवसणी घालणारी सह्याद्रीची शिखरे आणि अभेद्य कातळकडे यांचे. अत्यंत सौंदर्यदृष्टीने चौफेर शांतपणे नजर टाकली, तर काश्मीरच्या किंवा केरळच्या



हाऊसबोटमधून दिसणाऱ्या स्वर्गीय नजाऱ्याची आठवण होते. येथे दूरवर पाण्यात बोटिंग करण्याचा आनंद विलक्षण आहे. त्यानंतर पुढे जाताना नेकलेस फॉल, न्हाणी फॉल असे अंतरा अंतरावर उंच सह्याद्री शिखरातून कोसळणारे मनोहारी धबधबे आणि नीरव शांततेत मंजुळ गाणी गाणारे शुभ्रधवल, स्वच्छ झरे यांचे दर्शन होते. आबालवृद्धांना या झऱ्यांच्या थंडगार पाण्यात डुंबण्याचा आस्वाद घेण्याचा मोह झाल्याशिवाय राहत नाही. येथील वनस्पती, नानातऱ्हेच्या वृक्षवेली, फुले, साळिंदर-शेकरूसारखे पशुपक्षी यांचे होणारे मनमुराद दर्शन; येथील जैववैविध्याच्या भांडाराची पदोपदी ग्वाही देतात. वनस्पती व जीवशास्त्रज्ञांना येथे संशोधनासाठी मोठी जैववैविध्याची संपदा आहे. रस्त्यात उजव्या बाजूला दिसणारे आदिवासींचे कौलारू घरांचे पाडे म्हणजे निसर्गसौंदर्याच्या शिरपेचातील मोतीच जणू! गोदावरीच्या दोन उपनद्या म्हणजे हरिश्चंद्र गडावर उगम पावणारी मुळा आणि रतनगडावर उगम पावणारी प्रवरा. या दोन नद्यांच्या खोऱ्यात पसरलेले कळसुबाई अभयारण्य म्हणजे जैववैविध्यतेचे भांडार. याच परिसरात ट्रेकिंगची आवड असणाऱ्या गिरीप्रेमींसाठी मोठी पर्वणी आहे. रतनगड, हरिश्चंद्र गड, अलंग, कुलंग, मदनगड, कळसुबाई असे अनेक गडकिल्ले आहेत.

## दंतकथेचा परिसर

निसर्गसौंदर्याने वेढलेला हा परिसर पौराणिक दंतकथेतही आहे. वाल्मिकी ऋषी, अगस्ती ऋषी यांच्या पदस्पर्शाने हा परिसर पावन झालेला

आहे. त्याची साक्ष देणारी आणि अध्यात्माचा वारसा सांगणारे रतनवाडीचे अमृतेश्वर मंदिर याच परिसरात आहे. हेमाडपंथी बांधकामातील यक्ष, किन्नर, मैथुन यांची अप्रतिम शिल्पं या मंदिरात आहेत. रतनवाडीच्या जवळचे सह्याद्रीचे शिखर म्हणजे रतनगड, अलंग, मदन, कुलंग ही प्रसिद्ध शिखरे, ट्रेकिंगची आवड असणाऱ्यांना सुखावणारी ठिकाणे आहेत. रतनगडाच्या कुशीतच प्रवरा नदीचा, ज्यावर भंडारदरा धरण बांधलेले आहे, तिचा उगम होतो. येथील यादवकालीन पाण्याच्या टाक्या, प्रवरेचा उगमकुंड सुंदर आहे. भौगोलिक सौंदर्याचा एकमेव द्वितीय चमत्कार असलेली सांदणदरी याच परिसरातील २०० ते ४०० फूट खोल असलेली, ४ कि.मी. लांब असलेली दरी म्हणजे निसर्गाच्या चमत्काराचे एक देखणे रूप.

पावसाळ्यात येथे पाणी असल्याने या दरीतून जाण्याचा आनंद थोडासा धोकादायक, परंतु अवर्णनीय असतो. या परिसरात आपल्याला पांढऱ्या पाठीच्या गिधाडाचेही दर्शन अनुभवायला मिळू शकते. सांदणदरीची सफर संपवून पुढे गेले की दर्शन होते ते ३,००० फूट खोलीच्या कोकणकड्याचे. येथूनच मानवनिर्मित अभियांत्रिकी सौंदर्याचा नमुना असलेल्या घाटघर उदंचन प्रकल्पाचे दृश्यही मनोहारी आहे. येथील



घाटनदेवीचे छोटे मंदिर, पावसाळ्यात धुक्याने भरलेली खोल दरी, आपल्या अंगाला हळुवार स्पर्श करणाऱ्या धुक्याच्या लाटा हे सारे काही बेधुंद, मंत्रमुग्ध करून टाकते. येथेच जवळ बॅक वॉटरच्या बेटावर वन विभागाने सुंदर इको व्हिलेज वसवलेले आहे. येथे सुसज्ज अशा २०-२५ रूम्स आहेत. अस्सल आदिवासी स्वाद असलेले चविष्ट जेवण येथे मिळते. सुंदर गवताने, फुलांनी नटलेली बाग, महाकुंभ, सुंदर मंदिर येथे आहेत. हा परिसरही फारच फोटोजेनिक आहे. संध्याकाळी ४-५ कुटुंबे एकत्र येऊन येथे मुक्कामाला आलात, तर गाण्याच्या भेंड्या सांस्कृतिक कार्यक्रम असा सांस्कृतिक बेतही या ठिकाणी फुलू शकतो. अगोदर संपर्क साधला, तर ठाकर या आदिवासी जमातीचा सुंदर कोंबडा नाच बघण्याची संधी मिळू शकते. कोकणकडा, इको सिटी हे बॅक वॉटरचे टोक आहे. तेथून परतीचा प्रवास करताना बॅक वॉटरच्या मध्यभागी एक सुंदर पांजरे बेट वसवलेले आहे. अथांग जलाशयातील हिरव्या पाचूचे हे बेट अत्यंत सुंदर आहे. येथे प्रदक्षिणेसाठी ४ कि.मी.ची निसर्ग पायवाट आहे. तेथून पुढे आल्यावर या छोट्या गावात येतो आणि आपली ४० कि.मी.ची निसर्गसौंदर्याने नटलेली परिक्रमा पूर्ण होते. भंडारदरा परिसर मुंबई, पुणे, नाशिक या मोठ्या शहरांपासून जवळच्या अंतरावर आहे. मुंबईपासून १७५ कि.मी. पुण्याहून १५० किमी, नाशिकहून ७० कि.मी. अंतरावर आहे. येथे आनंदवन, यश, नेकलेस यांसारखे शहरी लोकांचे चोचले पुरवणाऱ्या सर्व सुविधांनी सुसज्ज रिसॉर्ट आहेत. खवय्यांसाठी चुलीवरच्या भाकरी, गावठी चिकनचा पातळ रसा, पिठले, ठेचा येथे मिळू शकतो. बॅक वॉटरला प्रदक्षिणा घालता यावी, यासाठी सह्याद्रीचे कोकणकडे आणि निळेशार पाणी यातून जाणारे सुंदर रस्ते येथे आहेत.

## मध्ययुगीन मंदिरांचा प्रदेश

सह्याद्रीच्या मुख्य रांगेत गिरीप्रेमींना वेड लावणारा हरिश्चंद्रगड म्हणजे जैवविविधता अभ्यासक, भूस्तरशास्त्रज्ञ, सांस्कृतिक परंपरांचे, अध्यात्माचे अभ्यासक यांच्यासाठी मोहिनी घालणारा गड आहे. या गडावर तारामती (उंची १,४०७ मी.) हे उंच शिखर पुणे, ठाणे व अहिल्यानगर या तीन जिल्ह्यांच्या सीमेवर आहे. या गडावर हरिश्चंद्रेश्वर शिवालय, केदारेश्वराचे लेणे, सप्ततीर्थ, तारामती शिखराच्या पायथ्याशी असलेली लेणी या मध्ययुगीन हेमाडपंथी स्थापत्यशास्त्राचे उत्कृष्ट नमुने आहेत. शिलाहारवंशीय शिवभक्त राजाने भूमिज शैलीत रतनगडच्या पायथ्याशी बांधलेले अमृतेश्वर मंदिर खूप सुंदर आहे. याच परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज यांनी सुरत लुटल्यावर जेथे विश्रांती घेतली, तो पट्टा किल्ला आहे. पट्टा किल्ल्याकडे जाताना टाहाकरी या गावातील जगदंबा मंदिर हे मध्ययुगीन पंचभूम भूमिजप्रासाद या स्थापत्यशैलीतील मंदिर आहे. सभामंडपाचे कलात्मक छत, रेखीव खांब, गाभाऱ्यातील चौकटीचे उत्तरांग, तीन दिशांच्या देवकोष्ठातील देवींच्या मूर्ती, दर्शनी भागातील कामशिल्पे अशी एक ना अनेक अप्रतिम शिल्पांकनाचे नमुने आहेत. प्रवरेच्या काठावरचे अकोले येथील सिद्धेश्वर मंदिर हेही अप्रतिम शिवमंदिर आहे. सभामंडपातील अमृतमंथन शिल्प, गर्भगृहाची रेखीव द्वारशाखा, मंदिराचे बाह्य अलंकरण हे सर्वच अप्रतिम आहे.

अशा प्रकारे निसर्गप्रेमी, गिर्यारोहक, जैवसंपत्तीचे अभ्यासक, अध्यात्माचे उपासक अशांसाठी आणि आबालवृद्धांसाठी येथे फार मोठा सौंदर्याचा खजाना उपलब्ध आहे. झगमगाटाच्या दुनियेत मात्र हा सुंदर परिसर आजही काहिसा अपरिचित आहे. विशेषतः मुंबई, पुणे, नाशिक यांसारख्या तीन मेट्रोपॉलिटन शहरांपासून हे ठिकाण तुलनेने खूप नजीकचे आहे. पाटबंधारे विभागाचे गेस्ट हाऊस, ॲग्रो टुरिझमचे रिसॉर्ट्स, टेन्ट्सची व्यवस्था, यश रिसॉर्ट (संपर्क नं. ७७३८७७२७७५), आनंदवन रिसॉर्ट (संपर्क नं. ९९२०३११२२१) वन खात्यामार्फत साम्रद, रतनवाडी, पांजरे, घाटघर येथे टेंटची सुविधा, मुक्कामासाठी घरे अशा सर्व सुविधा येथे पर्यटकांसाठी उपलब्ध आहेत.

अकोले येथे अमृतवाहिनी प्रवरा नदीच्या काठी अगस्ती ऋषींचा आश्रम आहे. ही भूमी अगस्ती ऋषींच्या वास्तव्याने पुनीत झालेली आहे. आर्य - अनार्यांचा संघर्ष जेव्हा टोकाला गेला होता, तेव्हा मुंडा जमातीतील लोपामुद्रेशी विवाह करून समन्वय प्रस्थापित करण्यास अगस्ती ऋषींनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली होती. तोच हा परिसर आहे.

अशा या अमौलिक विविधतेने नटलेल्या भंडारदरा आणि परिसरातील स्वर्गीय सौंदर्य स्थळांचा लाभ घ्यावा, असे या लेखाच्या निमित्ताने मी आवाहन करतो.

**(सहसचिव, महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन.)**

# कर्मयोगी संत गाडगेबाबा आणि समाजप्रबोधन

**प्रवीण टाके**

***महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सुधारणावादी परंपरेत १९०५ ते १९५६ असे सतत पाच दशके ज्यांनी समाजसुधारणा घडवून आणल्या, त्या कर्मयोगी संत गाडगेबाबा यांची जयंती (दि. २३ फेब्रुवारी). भुकेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, उघड्या-नागड्यांना वस्त्र, गरीब मुला-मुलींना शिक्षण, बेघरांना आसरा, दिव्यांगांना औषधोपचार, बेकारांना रोजगार, पशुपक्षी-मुक्या प्राण्यांना अभय, गरीब तरुण-तरुणींचे लग्न, दुःखी व हतबल असणाऱ्यांना हिंमत देण्याची आचरण सूत्री सांगून त्यालाच रोकडा धर्म म्हणणारे गाडगेबाबा आज स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी पर्वातही समाजाचा आरसा बनून मार्गदर्शन करत आहेत.***



गाडगेबाबा म्हणजे भारतीय समाज सुधारणेतील आधुनिक काळातील एक अत्यंत महत्त्वाचे आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व. वैराग्याचा मूर्तिमंत आविष्कार म्हणजे गाडगेबाबा. लोकशिक्षणाचे चालते-बोलते विद्यापीठ म्हणजे गाडगेबाबा. अंधश्रद्धेवर थेट प्रहार म्हणजे गाडगेबाबा. दिव्यांगांचा, निराश्रितांचा बाप म्हणजे गाडगेबाबा. जातिभेदांवर प्रहार म्हणजे गाडगेबाबा. हिंसात्मक कुळधर्मांना, नवसाला हद्दपार करणारा कर्मयोगी म्हणजे गाडगेबाबा. मुक्या प्राण्यांच्या बळी प्रथेविरुद्धचा प्रबोधनकार म्हणजे गाडगेबाबा. थोडक्यात त्यांच्या जीवनाचे ध्येय सर्वसामान्यांचे कल्याण, अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता आणि देवधर्माच्या अंध फेऱ्यात अडकून पडलेल्या समाजाला मानवतेचा श्रेष्ठ आदर्श घालणे होते.

संत गाडगेबाबांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील शेंडगाव येथे झाला. लहानपणी त्यांना डेबू म्हणत. त्यांच्या वडिलांचे नाव झिंगराजी आणि आईचे नाव सखूबाई होते. आडनाव जानोरकर. लहानपणीच व्यसनाधीनतेने वडिलांचे निधन झाल्यामुळे ते आपल्या आईसोबत अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे या गावी मामाकडे राहायला गेले. त्यांच्या जीवनातील प्रारंभिक काळातील संघर्षांनी, कुप्रथांनी व त्यातून आलेल्या दुःखांनी त्यांच्या मनात समाजसेवेचा आणि दीन-दुखितांच्या मदतीचे बीज रुजवले. शेती, माती, संसारामध्ये रमलेल्या डेबुजींना तत्कालीन समाजातील अंधश्रद्धा व कुप्रथांनी समाजासाठी लढण्यास प्रवृत्त केले.

१९०५ नंतर त्यांनी कुटुंब आणि संसार त्यागून गावोगावी फिरून लोकांना समाजातील दोष समजावून सांगण्याचा निर्णय घेतला. केवळ महाराष्ट्रच नाहीत, तर गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश व अन्य राज्यातही त्यांनी प्रबोधनाचे कार्य केले.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वाचा भाग म्हणजे त्यांनी कीर्तनात्मक भजनातून अंधश्रद्धा निर्मूलन केले. आपल्या वऱ्हाडी भाषेमध्ये सहज विनोदाची, संवादाची पेरणी करत आणि जगण्यातील विसंगती मांडत त्यांनी कर्मकांडावर हल्ला केला. त्यांचे कीर्तन म्हणजे विवेचनकार आणि श्रोते यांच्यातील प्रश्नोत्तराचा सुलभ सादरीकरणाचा प्रबोधनात्मक आविष्कार होता. या अशिक्षित माणसाच्या कीर्तनाचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापासून आचार्य प्र. के. अत्रे, पंजाबराव देशमुख यांच्यासारख्या विद्वानांनी खाली बसून रसग्रहण केले. साध्या सोप्या शब्दांमध्ये ते विवेचन करायचे. त्यांच्या विवेचनाला 'गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला' या भजनाचे पार्श्वगायन असायचे. विशेष म्हणजे संपूर्ण श्रोते भजन गायनात सहभागी व्हायचे. समाजाच्या अंधश्रद्धा, चाली, रूढी, परंपरा यावर तुटून पडण्याच्या त्यांच्या आक्रमक शैलीचे वर्णन करताना आचार्य अत्रे यांनी म्हटले होते 'सिंहाला पाहावे वनात, हत्तीला पाहावे रानात, गाडगेबाबांना पाहावे कीर्तनात..'

भारतीय संत परंपरेतील क्रांतिकारक विचार मांडणाऱ्या संत तुकाराम, संत कबीर यांच्या अभंग आणि दोह्यांचा अचूक वापर ते त्यांच्या कीर्तनात करायचे.

मुला-मुलींच्या जन्मासाठी मुक्या असाह्य प्राण्यांची हत्या करून नवस फेडणे आणि त्यासाठी कर्ज काढणे अशा रूढींवर ते आक्रमकपणे प्रहार करायचे. तुकोबारायांच्या अभंगांचा वापर करताना ते म्हणायचे:

*नवसे कन्या पुत्र होती*
*मग का करणे लागे पती*

किंवा पिंडदानासारख्या अनिष्ट प्रथांवर प्रहार करताना कीर्तनात कबीराचे दोहे वापरायचे:

*जीते बाप को रोटी ना दे*
*वह मरे बाद पछताए*
*मुठ भर चावल लेकर*
*कौवा को बाप बनाए*

उठ सूट शेंदूर फासून देव बनवणे, पुढे त्याचे मंदिर घडविणे आणि कर्मकांडात समाजाला बुडविणे याला विरोध करताना ते म्हणायचे:

*जत्रा मे फतरा बिठाया तीरथ बनाया पानी,*
*भई दुनिया बड़ी दिवानी ये तो पैसे की धुलधानी*

त्यांचे समाजप्रबोधनाचे विचार त्या काळातील भारतीय ग्रामीण जीवनाची परिस्थिती बदलण्याचा क्रांतिकारी प्रयत्न होते. त्या काळात भारतीय ग्रामीण भागामध्ये अंधश्रद्धा, कर्मकांड, नशा, धर्मभेद, प्राण्यांचे बळी, जातिभेद, अस्पृश्यता, हुंडा पद्धती आणि निरक्षरता या सर्व सामाजिक बंधनांनी लोकांचे मन जड झालेले होते. गाडगेबाबांनी आपल्या कीर्तनात अंधश्रद्धा, देव-धर्माविषयी चुकीचे विश्वास आणि सार्वजनिक अस्वच्छते विरुद्ध आघात केला.

गाडगेबाबांचे कार्य सर्वसामान्यांसाठी समर्पित होते. त्यांनी सार्वजनिक स्वच्छता आणि आरोग्यविषयक संदेश देण्यासाठी ते ज्या गावात प्रवेश करत, तेथे प्रथम स्वयं आणि उपस्थित लोकांसोबत मिळून रस्ते, सार्वजनिक जागा, मंदिर परिसर, तलाव अशा सर्व ठिकाणी स्वच्छता अभियान राबवायचे. याच ठिकाणी त्यांनी धर्मशाळा, आश्रम शाळा, नद्यांचे घाट, पाणपोया, गोरक्षण उघडले. स्वतः खराटा घेऊन त्यांची स्वच्छता सुरू व्हायची. त्यांचा संदेश फक्त उपदेश स्वरूपात नव्हे, तर प्रत्यक्ष कार्य करून दाखवून देण्याची प्रेरणा म्हणून होता.

कीर्तनाचा प्रारंभ हा स्वच्छता अभियानातून करणारा हा महापुरुष तत्कालीन समाजव्यवस्थेत धार्मिक पाखंडावर आसूड उमटवायचा. 'मंदिरात देव शोधणे' याऐवजी 'माणसातच देव शोधा' हा त्यांचा परखड संदेश होता. देव दगडात नाही तो माणसात आहे, असे ते देवकीनंदन गोपाला हे भजन गाताना उदाहरणे देऊन व श्रोत्यांशी संवाद साधून ते स्पष्ट करायचे.

गाडगेबाबांनी फक्त भाषण किंवा कीर्तनाचाच अवलंब केला नाही, तर त्यांनी आपल्या कमाईतून आणि लोकांच्या देणगीतून अनेक धर्मशाळा, अन्नछत्र, वृद्धाश्रम, गोशाळा आणि रुग्णालय परिसरात धर्मशाळा उभारल्या. मुंबई, पंढरपूर, नाशिक, पुणे, आळंदी, देहू आणि अमरावती येथे त्यांच्या पुढाकारात धर्मशाळा उभारल्या गेल्या. मुंबईतील जे.जे. हॉस्पिटल धर्मशाळा (१९५४) सारख्या सामाजिक उपक्रमांत त्यांनी योगदान दिले. मुंबईत वैद्यकीय उपचारासाठी जाणाऱ्या महाराष्ट्रातील तमाम गरीब बांधवांसाठी राहण्याची सोय त्यांनी त्या काळात केली. अनेक ठिकाणी निवारे, धर्मशाळा उभारून गरीब, दलित आणि गरजू लोकांना संरक्षण मिळवून दिले. मानवा-मानवातील भेद दूर करत सहजीवनाचा आदर्श दिला.

जातिपाती, अस्पृश्यता, अज्ञानात खितपत पडलेल्या ग्रामीण जनतेला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांच्याच भाषेत समाज प्रबोधन केले. लोकांना जात-पात, सामाजिक भेदभाव,अस्वच्छता यातून बाहेर काढत कर्मातून आयुष्य घडवण्याची शिकवण दिली. संवादावर त्यांचा विश्वास होता. शिक्षणातूनच सामाजिक सुधारणा होऊ शकते हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना तत्कालीन समाजव्यवस्थेत रुजविण्याचे कार्यही त्यांनी स्वतः केले. शिक्षणाने माणूस किती मोठा होतो, यासाठी ते बाबासाहेबांचे उदाहरण समोर बसलेल्या जनतेला द्यायचे. जातिभेदात, चातुर्वर्णात डुंबलेल्या तत्कालीन समाज व्यवस्थेला बाहेर काढण्यासाठीच्या त्यांच्या धडपडीचे बाबासाहेब आंबेडकर यांनीदेखील कौतुक केले. गाडगेबाबांच्या समाज आणि जातिभेदाविरुद्धच्या कार्याचे महत्त्व बाबासाहेबांनी मान्य केले. गाडगेबाबा त्या काळातील काही थोर व्यक्तिमत्त्वांशी संवाद साधणारे व्यक्ती होते. त्यांच्या कार्याला प्रेरणा आणि समन्वय दोन्ही मिळाले.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याशी गाडगेबाबांच्या मैत्री आणि आदराचे संबंध होते. भाऊरावांच्या शिक्षण व सामाजिक कार्याचा उल्लेख ते आपल्या कीर्तनात करायचे. भाऊरावांनी गाडगेबाबांच्या निधनावर अतिशय भावनिक संवेदना व्यक्त केल्या होत्या.

डॉ. पंजाबराव देशमुख, इतिहासातील अन्य एक समाजसेवक आणि राजकीय व्यक्तिमत्त्व, यांच्या कार्यात गाडगेबाबांनी काही प्रमाणात सहकार्य केले आणि त्यांच्या योजना, शिक्षण आणि समाजसुधारणा कार्यक्रमांना पाठिंबा दिला. गाडगेबाबा आणि तुकडोजी महाराज यांच्या विचारधारांमध्ये सामाजिक समता, स्वच्छता आणि ज्ञानविकास अशा मुद्द्यांवर साम्य होते. साने गुरुजी यांच्याशी त्यांचा विशेष स्नेह होता, तर समाजसुधारक प्रबोधनकार ठाकरे यांनी त्यांच्यावर पुस्तक लिहून गाडगेबाबांच्या कार्याला जनतेसमोर आणले होते.

## अंधश्रद्धा, वर्ण आणि सामाजिक कायदा

गाडगेबाबांनी अंधश्रद्धा आणि जातिवादाविरुद्ध सतत भाष्य केले. त्या काळात अनेक भोंदू बाबा, महाराज आणि तीर्थस्थळांची पूजा करून आपले जीवन सुधारेल, असा विश्वास ठेवत असताना गाडगेबाबांनी हे स्पष्ट केले की, खोटे देव, तीर्थक्षेत्र आणि आचार हे मानवाच्या प्रगतीत व्यत्यय आणतात. देव आणि धर्म यांच्या चौकटीत भारतीय समाजव्यवस्था रसातळाला जाईल आणि त्यातून बाहेर पडल्याशिवाय नवभारताची निर्मिती होऊ शकत नाही. हे ७५ वर्षांपूर्वी या महामानवाने गावागावातील जनतेला समजून सांगण्याचे महत्कार्य केले. सामाजिक सुधारणा, सामाजिक उपाय, शिक्षण आणि मानवीमूल्यांचा अवलंब करणे अधिक परिणामकारक आहे, हे त्यांनी सामान्य माणसासोबतच व्यवस्थेला समजावण्याचे धारिष्ट दाखविले.

गाडगेबाबांनी आपल्या कार्याच्या शेवटच्या काळात ८ नोव्हेंबर १९५६ रोजी मुंबईत एक सार्वजनिक कीर्तन केले. गाडगेबाबांचे शेवटचे भाषण आजही सर्वत्र उपलब्ध आहे. अशिक्षित असणाऱ्या या समाजसुधारकाच्या जात, धर्म, स्वच्छता आणि शिक्षणाबाबतच्या कल्पना किती स्पष्ट होत्या, क्रांतिकारी होत्या, याची जाणीव आजही समाजाला ठेवणे गरजेचे आहे. देशाने अमृतमहोत्सवी वाटचाल पूर्ण केल्यानंतरही त्यांचे विचार आजही कालसापेक्ष आहे.

गाडगेबाबांनी आयुष्यभर समाजसेवा केली. मात्र स्वतःच्या नावाने आश्रम, मठ उभारणे त्यांना मान्य नव्हते. ते स्वतः म्हणायचे मी कुणाचा गुरू नाही, माझा कुणी चेला नाही.

शेवटी २० डिसेंबर १९५६ रोजी अमरावती जिल्ह्यातील वलगाव येथे हा महान सुधारक अंतिम प्रवासासाठी प्रस्थान करता झाला. त्यांचा वारसा आजही जिवंत आहे. महाराष्ट्र शासनाने त्यांच्या नावाने 'संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान' आणि राष्ट्रीय पातळीवर पुरस्कार योजना सुरू केल्या आहेत. तसेच अमरावती विद्यापीठाचे नाव संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ ठेवण्यात आले आहे, हा त्यांच्या कार्याचा सन्मान आहे.

**(उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर, महाराष्ट्र शासन.)**

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले : स्त्रीशिक्षणाच्या लढ्यातील अग्रणी दीपस्तंभ



भारतातील स्त्री शिक्षणाच्या इतिहासात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्थान अत्यंत मोलाचे आहे. त्या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका, मुख्याध्यापिका आणि थोर समाजसुधारक म्हणून ओळखल्या जातात. स्त्रियांना शिक्षणाचा हक्क मिळवून देण्यासाठी, समाजातील अन्यायकारक प्रथा दूर करण्यासाठी आणि महिलांना स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा देण्यासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांच्या कार्यामुळे भारतीय समाजात परिवर्तनाची नवी ज्योत पेटली.

सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे झाला. त्या काळात मुलींना शिक्षण देण्याची प्रथा नव्हती. मात्र त्यांचे पती महात्मा जोतिराव फुले यांनी त्यांना शिक्षण दिले आणि समाजसेवेची प्रेरणा दिली. शिक्षणाचे महत्त्व जाणून सावित्रीबाईंनी स्वतः शिक्षण घेतले आणि पुढे समाजातील मुलींसाठी शिक्षणाची दारे उघडली.

१८४८ साली पुण्यातील भिडेवाड्यात सावित्रीबाई फुले आणि महात्मा जोतिराव फुले यांनी मुलींची भारतातील पहिली शाळा सुरू केली. हा निर्णय त्या काळच्या सामाजिक परिस्थितीत अत्यंत धाडसी होता. मुलींना शिक्षण देण्याच्या त्यांच्या कार्याला समाजातील काही रूढीवादी घटकांनी विरोध केला. सावित्रीबाईंवर दगड-माती फेकली जात असे, त्यांना अपमान सहन करावा लागे; तरीही त्यांनी शिक्षणाचा प्रसार करण्याचे काम खंडित होऊ दिले नाही.

स्त्री शिक्षणाबरोबरच सावित्रीबाईंनी समाजसुधारणेच्या अनेक क्षेत्रांत कार्य केले. बालविवाह, सतीप्रथा आणि जातिभेद यांसारख्या कुप्रथांविरुद्ध त्यांनी आवाज उठवला. विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन देऊन महिलांच्या सन्मानासाठी त्यांनी मोठे कार्य केले. समाजातील अनाथ आणि शोषित महिलांसाठी त्यांनी 'बालहत्या प्रतिबंधक गृह' सुरू केले. ज्यामुळे अनेक महिलांना आणि नवजात बालकांना आधार मिळाला.

सावित्रीबाई फुले या केवळ समाजसुधारक नव्हत्या, तर त्या साहित्यिकही होत्या. त्यांनी आपल्या विचारांचे आणि सामाजिक जाणिवांचे प्रतिबिंब काव्यातून व्यक्त केले. 'काव्यफुले' (१८५४) आणि 'बावनकशी सुबोध रत्नाकर' (१८९२) हे त्यांचे काव्यसंग्रह समाजप्रबोधनाचे प्रभावी साधन ठरले.

१० मार्च १८९७ रोजी प्लेगच्या साथीत रुग्णांची सेवा करताना सावित्रीबाई फुले यांचे निधन झाले. आजारी लोकांची सेवा करत असताना स्वतःच्या जीवाची पर्वा न करता त्यांनी केलेली सेवा त्यांच्या करुणामय आणि समर्पित व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवते.



सावित्रीबाई फुले यांनी केलेले कार्य आजही समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी स्त्रियांना शिक्षण, स्वाभिमान आणि समानतेचा मार्ग दाखवला. समाजातील अंधश्रद्धा आणि अन्यायाविरुद्ध लढा देत त्यांनी सामाजिक परिवर्तनाची ज्योत पेटवली. म्हणूनच त्यांना 'क्रांतिज्योती' आणि 'ज्ञानज्योती' म्हणून सन्मानाने ओळखले जाते.

त्यांच्या कार्यातून समाजाला समानता, शिक्षण आणि मानवतेचे मूल्य जपण्याची प्रेरणा मिळते. स्त्री शिक्षणाच्या इतिहासात सावित्रीबाई फुले यांचे योगदान सदैव उज्ज्वल आणि प्रेरणादायी राहील.

**टीम आपलं मंत्रालय**

# समतेचा आणि भक्तीचा संदेश देणारे महान संत : संत तुकाराम महाराज

महाराष्ट्राच्या संतपरंपरेत संत तुकाराम महाराज यांचे स्थान अत्यंत उंच मानले जाते. १७व्या शतकात जन्मलेल्या या महान संतकवीने आपल्या अभंगवाणीतून भक्ती, समता आणि सत्याचा संदेश सामान्य जनतेपर्यंत पोहोचवला. वारकरी संप्रदायाच्या परंपरेत संत तुकाराम हे कळस मानले जातात.

*सुंदर ते ध्यान उभे विटेवरी ।*
*कर कटेवरी तया शोभे ।।१।।*
*तुळसी हार गळां कासे पीतांबर ।*
*आवडे निरंतर हेंचि ध्यान ।।ध्रु.।।*
*मकरकुंडले तळपती श्रवणी ।*
*कंठी कौस्तुभमणि विराजित ।।२।।*
*तुका म्हणे माझे हेंचि सर्व सुख ।*
*पाहीन श्रीमुख आवडीनें ।।३।।*

पुणे जिल्ह्यातील देहू या पवित्र भूमीत माघ शुद्ध पंचमी (वसंत पंचमी) या दिवशी त्यांचा जन्म झाला. त्यांचे पूर्ण नाव तुकाराम बोल्होबा आंबिले (मोरे) असे होते. त्यांच्या वडिलांचे नाव बोल्होबा आणि आईचे नाव कनकाई होते. धार्मिक आणि संस्कारयुक्त वातावरणात त्यांचे बालपण गेले.

संत तुकाराम महाराज यांनी आपल्या आयुष्यभर विठ्ठल याला आराध्य दैवत मानून अखंड भक्ती केली. त्यांनी हजारो अभंग रचले. त्यांच्या अभंगांमध्ये अध्यात्म, वेदांत, समाजसुधारणा आणि मानवतेचा संदेश अत्यंत साध्या आणि लोकभाषेत मांडलेला दिसतो. त्यामुळे अभंग म्हटला की, तो तुकारामाचाच असेही म्हटले जाते. तुका आकाशाएवढा या प्रसिद्ध अभंगासारख्या अनेक रचनांनी लोकांच्या मनावर अमीट छाप पाडली.

संत तुकाराम महाराज हे केवळ कवी नव्हते, तर ते समाजसुधारकही होते. त्यांनी समाजातील अन्याय, जातिभेद आणि आडमुठ्या रूढींवर कठोर शब्दांत टीका केली. सर्व मानव समान आहेत, प्रेम आणि करुणा हीच खरी धर्माची ओळख आहे, असा संदेश त्यांनी दिला. संत परंपरेत संत ज्ञानेश्वर यांनी घातलेल्या पायावर वारकरी परंपरेचा संत तुकाराम महाराज यांनी कळस चढवला.

आधी केले मग सांगितले ही त्यांच्या जीवनाची मुख्य शिकवण होती. त्यांनी स्वतः साधेपणा, प्रामाणिकपणा आणि भक्तीचा मार्ग स्वीकारला आणि त्याच मार्गावर समाजालाही चालण्याचे आवाहन केले. त्यांच्या अभंगवाणीतून जीवनातील दुःख, भीती आणि निराशा यांवर मात करण्याची प्रेरणा मिळते.



संत तुकाराम महाराज यांनी प्रपंच आणि परमार्थ यांचा सुंदर समतोल साधला. संसारात राहूनही भक्ती करता येते, आणि परमेश्वराशी नाते जोडता येते, हे त्यांनी आपल्या जीवनातून दाखवून दिले. त्यामुळे त्यांच्या विचारांचा प्रभाव आजही वारकरी संप्रदायासह संपूर्ण महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनावर दिसून येतो.

संत तुकाराम महाराज यांचा स्मृतिदिन 'तुकाराम बीज' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस फाल्गुन वद्य द्वितीयेला येतो. वारकरी संप्रदायात हा दिवस अत्यंत पवित्र मानला जातो. भक्तांच्या श्रद्धेनुसार संत तुकाराम महाराज सदेह वैकुंठाला गेले, अशी परंपरागत कथा सांगितली जाते. त्यांच्या शेवटच्या कीर्तनात त्यांनी *'आम्ही जातो अमुच्या गावा, अमुचा रामराम घ्यावा'* हा अभंग गायल्याचा उल्लेख आढळतो.

तुकाराम बीजनिमित्त देहू येथे मोठा उत्सव भरतो. इंद्रायणी नदीच्या काठी असलेल्या विठ्ठल मंदिरात आणि वैकुंठगमन मंदिरात मुख्य सोहळे होतात. या दिवशी लाखो वारकरी येथे एकत्र येतात. भजन, कीर्तन, अभंगगायन आणि दुपारी होणारी महाआरती हे या उत्सवाचे प्रमुख आकर्षण असते.

देहू येथील मंदिर परिसरात असलेल्या नांदुरकीच्या झाडाबद्दल एक विशेष श्रद्धा प्रचलित आहे. तुकाराम बीजच्या दिवशी दुपारी ठरावीक वेळी हे झाड हलते, असे भाविक मानतात. ही घटना संत तुकाराम महाराज यांच्या वैकुंठगमनाची प्रतिकात्मक आठवण म्हणून पाहिली जाते.

आजही संत तुकाराम महाराज यांचे अभंग आणि त्यांचा विचार समाजाला योग्य दिशा देत आहेत. भक्ती, समता, प्रेम आणि मानवतेचा संदेश देणारे संत तुकाराम महाराज हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेतील तेजस्वी दीपस्तंभ मानले जातात.

**टीम आपलं मंत्रालय**

# संजीवन समाधी

**अश्विनी पुजारी**




संत ज्ञानेश्वर माऊली यांनी वयाच्या अवघ्या २२व्या वर्षी आळंदी येथे संजीवन समाधी घेतली. जिवंत समाधी व संजीवन समाधी यांमध्ये मूलभूत स्वरूपाचा फरक असून, जिवंत समाधीनंतर कालांतराने देह नष्ट होतो; परंतु संजीवन समाधीत साधकाचा मृत्यू होत नाही, असे आध्यात्मिक परंपरेत मानले जाते.

संजीवन समाधीच्या प्रक्रियेत साधकाचे शरीर पंचमहाभूतांमध्ये विलीन होत असून, पृथ्वी, जल, अग्नी, वायू व आकाश या तत्त्वांमध्ये क्रमशः रूपांतरित होते, अशी धारणा आहे. त्यामुळे साधकाचा देह नष्ट न होता तो इच्छेनुसार प्रकट होऊ शकतो, असे मानले जाते.

संत ज्ञानेश्वरांच्या संजीवन समाधीनंतर त्यांचा विरह असह्य झाल्याने संत नामदेव यांनी त्यांना आर्त साद घातली. त्यानंतर ज्ञानेश्वर माऊलींनी प्रत्यक्ष दर्शन दिल्याचा उल्लेख संत नामदेवांनी आपल्या अभंगांमधून केला आहे. पुढे सुमारे २५० वर्षांनंतर संत एकनाथ यांच्याशी समाधीस्थानी तीन दिवस व तीन रात्री संवाद झाल्याची नोंद आढळते. तसेच सुमारे १०० वर्षांपूर्वी माधान येथील ज्ञानचक्षू गुलाबराव महाराज यांनाही ज्ञानेश्वर माऊलींचा साक्षात्कार झाल्याचे उल्लेख आढळतात.

ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधीच्या वेळी उपस्थित असलेल्या प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांना एकत्र आणण्याचा प्रयत्न प्रस्तुत नाटकाच्या माध्यमातून करण्यात आला आहे. या नाटकातील सर्व पात्रे ऐतिहासिक असून कोणतेही पात्र काल्पनिक नाही. बोबड्या बोलीतील अभंग हे ज्ञानेश्वर माऊलींचेच असून, त्यातून त्यांच्या बालसुलभ व आध्यात्मिक व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते.

संत ज्ञानेश्वर माऊली हे एक अखंड अभ्यासाचा व संशोधनाचा विषय असून, त्यांच्या दिव्य काव्याचा व चरित्राचा अभ्यास विविध अभ्यासक व संशोधकांकडून सातत्याने केला जात आहे. प्रस्तुत नाटकात समाधी या विषयाचे सखोल विवेचन करण्यात आले असून, संप्रज्ञात व असंप्रज्ञात समाधी या दोन प्रकारांचा आशय स्पष्ट करण्यात आला आहे. संप्रज्ञात समाधीत विचार व जाणीव शिल्लक राहते, तर असंप्रज्ञात समाधीत पूर्ण मुक्तता प्राप्त होते.

संजीवन समाधीच्या तत्त्वज्ञानाचा आशय स्पष्ट करणारे, आध्यात्मिक अनुभूतीचा लाभ घडविणारे आणि ऐतिहासिक संदर्भ सादर करणारे हे नाटक वैशिष्ट्यपूर्ण व अद्वितीय ठरते. संत नामदेव, संत एकनाथ, गुलाबराव महाराज आदींना झालेल्या ज्ञानेश्वर दर्शनांच्या उल्लेखांद्वारे एक अलौकिक आध्यात्मिक परंपरा या नाटकातून प्रभावीपणे उलगडण्यात आली आहे.

या माध्यमातून संत ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधीचे आध्यात्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक महत्त्व व्यापक वाचक वर्गापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**(सहायक संचालक, पुस्तक समीक्षक, महाराष्ट्र शासन.)**

# मानवतेचा, समतेचा आणि सेवाभावाचा तेजस्वी आदर्श

संजीवनी जाधव-पाटील

भारतीय संस्कृती आणि धर्मपरंपरा विविधतेत एकतेचा संदेश देणारी आहे. या महान परंपरेतील शीख धर्म हा मानवता, समता, सेवा आणि बंधुभाव यांचा संदेश देणारा एक प्रभावी धर्म म्हणून ओळखला जातो. शीख धर्माची सर्वात वैशिष्ट्यपूर्ण आणि जागतिक स्तरावर आदर्श ठरलेली परंपरा म्हणजे 'लंगर सेवा'. लंगर सेवा ही केवळ धार्मिक विधी नसून, ती सामाजिक समतेची, परोपकाराची आणि मानवी करुणेची जिवंत परंपरा आहे.

## लंगर सेवेचा ऐतिहासिक उद्‌गम

लंगर सेवेची संकल्पना शीख धर्माचे संस्थापक गुरुनानक देवजी यांनी १५व्या शतकात मांडली. त्या काळात भारतीय समाजात जातिभेद आणि सामाजिक विषमता मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होती. गुरुनानक देवजी यांनी या अन्यायकारक सामाजिक व्यवस्थेला आव्हान देत सर्व मानव समान असल्याचा संदेश दिला. त्यांनी गुरुद्वारामध्ये सर्वांसाठी मोफत भोजनाची व्यवस्था सुरू करून समाजातील भेदभाव नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

पुढील गुरूंनी लंगर परंपरेला अधिक सुसंगठित आणि व्यापक स्वरूप दिले. विशेषतः गुरू अमरदास जी यांनी 'पंगत' आणि 'संगत' या संकल्पनांचा प्रचार करून लंगर सेवेचा सामाजिक पाया मजबूत केला. गुरुद्वारामध्ये येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने गुरूंच्या दर्शनापूर्वी लंगरमध्ये बसून भोजन करावे, असा नियम त्यांनी केला. यामुळे समतेचा संदेश अधिक प्रभावीपणे समाजात रुजला.



## लंगर सेवेची तत्त्वज्ञानात्मक संकल्पना

लंगर सेवेचे तत्त्वज्ञान तीन मूलभूत मूल्यांवर आधारित आहे – समता, सेवा आणि सामूहिकता. शीख धर्मानुसार देव सर्वत्र आहे आणि सर्व मानव देवाचेच अंश आहेत. त्यामुळे मानवांमध्ये भेदभाव करणे म्हणजे देवाच्या इच्छेचा अवमान करणे होय. लंगर सेवेच्या माध्यमातून समाजातील सर्व स्तरांतील लोक एकाच पंक्तीत बसून भोजन करतात. राजा असो वा सामान्य नागरिक, श्रीमंत असो वा गरीब, स्त्री असो वा पुरुष–सर्वांसाठी समान आसन आणि समान अन्न दिले जाते.

लंगरमध्ये सेवा करणे हे शीख धर्मात अत्यंत पवित्र मानले जाते. अन्न तयार करणे, वाटप करणे, पाणी देणे, भांडी धुणे, स्वच्छता राखणे, हे सर्व कार्य स्वयंसेवक भावनेने केले जाते. या सेवेचे मूळ उद्दिष्ट अहंकाराचा त्याग करून मानवसेवेला सर्वोच्च मानणे हा आहे.

## लंगर सेवेची वैशिष्ट्ये आणि कार्यपद्धती

लंगर सेवेची कार्यपद्धती अत्यंत सुव्यवस्थित आणि लोकसहभागावर आधारित आहे. याची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :

- **मोफत भोजन व्यवस्था :** लंगरमध्ये कोणालाही शुल्क न देता अन्न दिले जाते.
- **सर्वधर्मसमभाव :** कोणत्याही धर्म, जात, भाषा किंवा देशातील व्यक्तीसाठी लंगर खुले आहे.
- **सामूहिक भोजन पद्धती :** सर्वजण जमिनीवर एकाच पंक्तीत बसून भोजन करतात. ज्यामुळे सामाजिक समतेची जाणीव निर्माण होते.
- **स्वयंसेवी सहभाग :** लंगर सेवा स्वयंसेवकांच्या सहभागावर चालते. समाजातील प्रत्येक व्यक्ती सेवा देऊ शकतो.
- **साधे आणि सात्त्विक अन्न :** लंगरमधील भोजन साधे, पोषणमूल्यपूर्ण आणि सात्त्विक असते.
- **शिस्त आणि स्वच्छता :** लंगरमध्ये स्वच्छता, शिस्त आणि सामूहिक सहकार्य यांना विशेष महत्त्व दिले जाते.

## लंगर सेवा आणि सामाजिक परिवर्तन

लंगर सेवा ही केवळ धार्मिक सेवा नसून ती सामाजिक परिवर्तनाची प्रभावी चळवळ आहे. इतिहासात भारतात जातिभेदामुळे समाजात विभाजन होते. लंगरने या विभाजनावर प्रहार करून समानतेचा संदेश दिला. गुरुद्वारामध्ये सर्वजण एकत्र बसून भोजन करतात. त्यामुळे सामाजिक भेदभाव नष्ट होतो आणि बंधुभाव वाढतो.

लंगर सेवा स्त्री–पुरुष समानतेचेही प्रतीक आहे. स्त्रिया आणि पुरुष



समान अधिकाराने सेवा करतात. त्यामुळे लिंगभेदाविरुद्ध सामाजिक संदेश दिला जातो. तसेच लंगर सेवा गरीब, गरजू आणि उपेक्षित घटकांसाठी आधारस्तंभ ठरते.

## आधुनिक काळातील लंगर सेवेचे जागतिक योगदान

आज लंगर सेवा केवळ भारतापुरती मर्यादित न राहता जागतिक स्तरावर मानवतेची सेवा करणारी चळवळ बनली आहे. भारतातील अमृतसर येथील हरमंदिर साहिब (स्वर्ण मंदिर) येथे दररोज लाखो भाविक आणि पर्यटकांना लंगर दिला जातो. हे जगातील सर्वात मोठ्या सामूहिक भोजन व्यवस्थांपैकी एक मानले जाते.

नैसर्गिक आपत्ती, पूर, भूकंप, दुष्काळ, युद्ध किंवा महामारीच्या काळात शीख समाजाने लंगर सेवेच्या माध्यमातून जगभर मानवतेची सेवा केली आहे. कोरोना महामारीच्या काळात भारतासह विविध देशांमध्ये शीख स्वयंसेवकांनी गरजू लोकांना मोफत भोजन पुरवले. ही सेवा मानवतेसाठी प्रेरणादायी ठरली.

## लंगर सेवेचा आध्यात्मिक आणि नैतिक संदेश

लंगर सेवा ही केवळ भौतिक अन्नपुरवठा नसून ती आध्यात्मिक शिक्षणाची प्रक्रिया आहे. सेवा करताना अहंकाराचा त्याग, करुणेची भावना आणि मानवतेचा आदर विकसित होतो. शीख धर्मानुसार सेवा म्हणजेच ईश्वराची पूजा होय. गुरू ग्रंथ साहिबमध्ये सेवेला अत्यंत महत्त्व देण्यात आले असून, सेवेमुळे मानवाला आत्मिक शांती आणि नैतिक उन्नती प्राप्त होते, असा संदेश दिला आहे. लंगर सेवा मानवी मूल्ये जपण्याची आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करते. प्रत्येक व्यक्ती समाजाचा एक घटक असून समाजसेवेसाठी योगदान देणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, ही भावना लंगरच्या माध्यमातून रुजवली जाते.

## शासकीय आणि सामाजिक दृष्टिकोनातून लंगर सेवा

शासकीय दृष्टिकोनातून पाहता लंगर सेवा ही सामाजिक समावेशन, अन्नसुरक्षा आणि समुदाय विकासाची प्रभावी संकल्पना आहे. ही सेवा सामाजिक विषमता कमी करण्यास, गरिबी निवारणास आणि आपत्ती व्यवस्थापनात साहाय्यक ठरते. स्वयंसेवी संस्थांद्वारे आणि धार्मिक संस्थांद्वारे राबवली जाणारी ही सेवा सामाजिक सहभाग आणि लोकसहभागाचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

'लंगर सेवा' ही लोकशाही मूल्यांशी सुसंगत असून समानता, बंधुता आणि सामाजिक न्याय यांना प्रोत्साहन देते. त्यामुळे सार्वजनिक धोरण निर्मितीमध्ये आणि सामाजिक विकास कार्यक्रमांमध्ये लंगर मॉडेलचा अभ्यास प्रेरणादायी ठरू शकतो.

## निष्कर्ष

'लंगर सेवा' ही शीख धर्माची एक महान देणगी असून, ती मानवतेच्या समतेचे, सेवाभावाचे आणि बंधुतेचे प्रतीक आहे. ही सेवा धार्मिक, सामाजिक, नैतिक आणि आध्यात्मिक अशा सर्व स्तरांवर मानवाला प्रेरणा देते. आजच्या काळात वाढती विषमता, सामाजिक तणाव आणि मानवी मूल्यांचा ऱ्हास यामुळे लंगर सेवेचा संदेश अधिकच महत्त्वाचा ठरतो.

सेवा हीच सर्वोच्च पूजा हा विचार लंगर सेवेच्या माध्यमातून संपूर्ण जगाला मिळालेला आहे. म्हणूनच लंगर सेवा ही केवळ शीख समाजाची परंपरा नसून संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आणि अनुकरणीय आदर्श व्यवस्था आहे.

**(सहायक संचालक, कोकण विभाग, नवी मुंबई, महाराष्ट्र शासन.)**

# बाईपण!

**अनघा पाटील**

बाईपण म्हटलं की, सहज प्रतिमा डोळ्यासमोर येते, ती कोमल, नाजूक अशी स्त्री आणि आठवते ती आई, ताई, पत्नी, मैत्रीण, लाडीक अशी मुलगी आणि सगळे लाड पुरवणारी आजी, किती ही रूपं तिची... लोभस, निरागस, सृष्टीचा सर्वात सुंदर आविष्कारच जणू... माणसात स्त्री असते तशीच निसर्गातसुद्धा एकानेक रूपात ती साकार होते बरं का... कधी डोळे भरून निसर्गाकडे पाहिलं की जाणवतं, आपल्यासारख्या शिणलेल्या कित्येकांना नदी, मंद सावली देणारी बल्लरी, पोसणारी माती, अशा अनेक रूपात ही सृष्टी आपलंसं करते. रांधा, वाढा, उष्टी काढा हा दिनक्रम या व्यक्तिविशेषाच्या भाळी कधीकाळीपासून अनामिकपणे रेखला गेलायं हे खरं. या स्त्रीच्या अस्तित्वाला साजरं करण्यासाठी जागतिक स्तरावर ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून पाळला जातो. बरं, मग हा ८ मार्चच का? तर याची मुळं आपल्याला अमेरिका, युरोप व रशियाच्या इतिहासात आढळतात.



त्याचं झालं असं की. i) १९ व्या शतकाच्या मध्यात अमेरिकेत Anti slavery moment उदयास आली होती, या चळवळीत एलिझाबेथ कॅंडो स्टेंटन व लुक्रेटिया मोट या महिलांनी देखील सहभाग नोंदवला होता; परंतु अमेरिकेत पार पडलेल्या Anti slavery summit मध्ये त्यांना मत मांडण्याचा अधिकार नाकारण्यात आला. त्यामुळे या दोघींच्या नेतृत्वात फेब्रुवारीच्या शेवटच्या रविवारी महिलांच्या विविध मागण्यांसंदर्भात आंदोलन करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला, या आंदोलनार्थ फलित म्हणून अमेरिकेच्या श्वेतवर्णी महिलांना १९२० पासून तर इतर सर्वांना १९६५ पासून मतदानाचा अधिकार मिळाला. ii) १९१० साली, युरोपमधील कोपेनहेगन, डेन्मार्क येथे दुसरी International conference on working women पार पडली. या परिषदेचे अध्यक्षपद होते ते Grandmother of communism म्हणून ओळखल्या जाणाऱ्या क्लारा झेटकीन यांच्याकडे. याच परिषदेत त्यांनी जागतिक महिला दिनाची संकल्पना मांडली होती. iii) तसेच रशियामधील कामगार संघटनांसोबत तेथील महिलांनीदेखील पहिल्या जागतिक महायुद्धाच्या काळात वाढती महागाई, कामाच्या ठिकाणी मिळणारी दुय्यम वागणूक या व अशा विविध कारणास्तव झारशाहीविरुद्ध आंदोलने केली. या आंदोलनांनी झारशाहीच्या पाडावात महत्त्वाची भूमिका बजावल्याचे दिसून येते.

या घटनांची परिणिती म्हणून संयुक्त राष्ट्रांनी १९७५ ला ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून घोषित करण्याचा पारित केला, या ठरावाची अंमलबजावणी ही १९७७ पासून करण्यात आली. हा दिवस महिलांनी स्वतःच्या हक्कांसाठी मिळालायं, हे तितकंच महत्त्वाचं...

हे झालं जगभरार्थ, आपण आपल्या भारतभूमीच्या संस्कृतीवरही एक नजर फिरवून घेऊ या... इतिहासाच्या पानांनी भारतातल्या स्त्रीला देवीचं स्थान दिलं. तिचे रूप प्रकृतीपासून ते जीवनदायिनीपर्यंत सर्वत्र पूजनीय आहे. भारताची स्त्री ही गार्गी, मंत्रेची सारख्या पांडित्यसंपन्न स्त्रियांचा वारसा घेऊन जन्मास येते. मधल्या गुलामगिरीच्या काही शतकांनी तिच्या अस्तित्वास ग्रहण लावण्याचा प्रयत्न केला खरा; पण जोतिराव व सावित्रीच्या रूपाने पुन्हा अ, आ, इ, ई गिरवण्यासाठी तिला क्रांतिज्योती लाभली. आता तोच वसा घेऊन आपली भारतीय नारी सर्व क्षेत्रात अग्रगण्य आहे. ग्रामपंचायतीतील सरपंच पदापासून ते राष्ट्रपतीपदापर्यंत आणि सीमेवर तैनात सैनिकांपासून ते अंतराळात पाऊलखुणा उमटवण्यापर्यंत तिने गगनभरारी घेतली आहे, खरं पाहता, कोणतंही पद हे Gender Bias नसते आणि हे स्त्रियांनी वेळोवेळी केलेल्या कामगिरीवरून सिद्धही करून दाखवलं आहे, खऱ्या अर्थानं हे उन्नत राष्ट्राचं, प्रगतीशील राष्ट्राचं प्रतीक असल्याचं म्हणता येईल.

शेवटच्या काही आवडलेल्या ओळी अशा की,

कुठे शोधावा महिला दिन?

कुटुंबासाठी स्वतःच्या स्वप्नांवर पाणी फेरणाऱ्या कुटुंबवत्सल स्त्रीमध्ये की, घर आणि नोकरी दोन्ही फ्रंट लीलया, पेलणाऱ्या रणरागिणीमध्ये कुठे शोधायचा महिला दिन.

गर्भाशयातून बाईपण पिऊन घेणाऱ्या बालिकेत की, आयुष्याच्या संध्याकाळी सगळ्यांची मनं जपून संसार करून थकलेल्या थरथरणाऱ्या हातात

*महिलादिनाचा शोध घेताना कधी होते घुसमट जीवाची...*
*कधी वाटते भीती आजची असुरक्षितता पाहता...*
*कधी होते चीडचीड तिची क्षमता असून डावललं जातं तेव्हा...*
*कधी दाटतो कंठ तिची उंचच भरारी पाहून...*
*या सर्व कोलाहलातून पुरून उरते ते*
*बाईचं बाईपण कालपण, आजपण आणि उद्यापण...*

**(पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई, महाराष्ट्र शासन.)**

# समता आणि समतोल

विलास कुडके

मनुष्यस्वभाव असा आहे की, तो ताटात मिळालेले लगेच खायला सुरुवात करणार नाही. तो आधी शेजारी बघेल. पलीकडे बघेल. अलीकडे बघेल. कोणाच्या ताटात आपल्या तुलनेत जास्त तर वाढलेले नाही ना याचे सूक्ष्म दृष्टीने अवलोकन करून; वाढप्याकडे तिरकस कटाक्ष टाकून, मगच खायला सुरुवात करील. काहींची काकदृष्टी इतकी विलक्षण असते की, वाढत येणाऱ्या वाढप्याच्या हाताच्या सूक्ष्म सर्वच हालचाली टिपून काढते आणि क्षणात तो आखूड हाताचा आहे की सढळ हाताचा, कोणाला झुकते माप दिले आहे, त्याची पारख करून ते मोकळे होतात.

पंक्तिभेद करू नये हे पूर्वापार चालत आलेले तत्त्व आहे. पंगतीत बसलेला मग तो राजा असो की, रंक, मित्र असो की शत्रू, गरीब असो की श्रीमंत कुठलाही भेदभाव न करता सर्वांना एकाच मापाने वाढावे, असे अभिप्रेत आहे. हे झाले जेवणाच्या पंगतीचे; पण हेच तत्त्व व्यवहारात सर्वच बाबतीत लागू होते. विद्यादान करताना कोणी 'अर्जुन' नसावा आणि कोणावर 'एकलव्य' होण्याची वेळ येऊ नये. विद्यार्थी म्हटला की, सर्वांना एकाच पारड्यात तोलून सारखेच विद्यादान करणे अभिप्रेत आहे.



## मोठे तत्त्व

समता हे फार मोठे तत्त्व आहे, या तत्त्वाचे पालन झाले तर प्रश्नच उरणार नाही; पण या तत्त्वाचे पालन होत नाही म्हणून तर सगळे प्रश्न आहेत, विषमता आहे, अन्याय आहेत, संघर्ष आहेत. पाऊस सर्वत्र सारखा पडत नाही, सर्वत्र सारखे पिकत नाही. सगळ्यांची ओंजळ सारखीच असली, तरी त्यात पडणारे दान मात्र माणसागणिक, प्रत्येक जिवागणिक वेगळे आहे. अखेर हातावरच्या सुरकुत्यांना नशिबाच्या रेषा समजून, मनुष्य समाधान मानून मोकळा होतो.

## समता आणि समतोल

'ठेविले अनंते तैसीची राहावे, चित्ती असू द्यावे समाधान' असे स्वतःला समजवतात. त्या परिस्थितीत लीन राहतात. काहीजण स्वतः ला कशाततरी बुडवून तल्लीन राहतात, तर काहींना कशाचाच बोध होत नसतो आणि त्यांची ती भ्रमित अवस्था प्रदीर्घ कशी टिकून राहते, याचेच नवल वाटते.

साधे रेल्वे प्रवासाचे उदाहरण घेतले तरी त्यात वेगवेगळे वर्ग निर्माण झालेले दिसतात. काही वर्ग ऐसपैस वातानुकूलित चैनीत प्रवास करतात, तर काहींना गुदमरत, कसाबसा रेटत-रेटत प्रवास करावा लागतो. प्रवासात एकच वर्ग असला आणि सगळ्यांना सारखीच सुविधा मिळाली तर काय हरकत आहे. मंदिरातही भाविक रांगेत आणि भाव असलेले विशेष दर्शनास पात्र असे चित्र आहे. न्यायदेवतेच्या हातात तराजू आहे आणि डोळ्यावर पट्टी. न्याय द्यायचा तो सर्वांना समान दिला पाहिजे हे न्यायतत्त्व आहे. व्यक्तिनिष्ठ भेदभाव हा न्याय होऊ शकत नाही. 'आपला तो बाब्या आणि दुसऱ्याचे ते कार्टे' ही ममत्वातील दूषित दृष्टी ठरेल. असा भेदभाव होत राहतो, म्हणून न्यायालयाकडे दाद मागितली जाते.

## वागण्यातला भेदभाव

समतेचे तत्त्व सर्वांनाच पटते आणि आवडते; परंतु हेच तत्त्व अंगीकारण्याची जेव्हा स्वतःवर वेळ येते तेव्हा हमखास आपण माणूस आहोत देव नाही, असा साक्षात्कार होऊन आपण मित्रांशी वागताना स्वतःशी प्रामाणिक नसतो. बऱ्याचदा झाड एका अंगणात असते आणि फुले मात्र शेजारी सांडलेली दिसतात. जेथे झाड लावलेले असते तिथे, चुकूनही एकही फूल नसते असे आपले वर्तन असू शकते. समानतेची वागणूक मिळण्याची अपेक्षा असणारे आपण, जेव्हा दुसऱ्याला अशी वागणूक देण्याची वेळ येते, तेव्हा मात्र दुजाभाव करू लागतो.

स्वाभाविकपणे भेदभाव, अन्याय करीत राहतात. त्याचे त्यांना काहीही वाटत नाही. कुठल्याही कार्यालयात गेले की, तेथे प्रकरण कोणत्या क्रमाने काढावे असे नियम असले तरी व्यक्तीपरत्वे हमखास प्रकरणांचा क्रम वरखाली किंवा मागेपुढे झालेला दिसतो. प्रकरण हाताळणारी माणसे समानतेचे तत्त्व फक्त त्यांच्या प्रकरणांमध्ये लागू करण्याबाबत आग्रही असले, तरी त्या तत्त्वांचा लाभ होईल, त्याला देण्याकडे त्यांचा फारसा कल नसतो.

अगदी स्वतःचा विचार केला तरी आपल्या मित्रांच्या कंपूमध्ये आपण सर्वच मित्रांना सारखे तोलत नाही. काही मित्र जीवश्चकंठश्च असतात, काही नावापुरते मित्र असतात, काही प्रतिष्ठा म्हणून मित्र असतात, काही जरुरीपुरते मित्र असतात, काही कामाला येतील असे मित्र असतात. काही आपले मित्रबळ सिद्ध करता येईल असे असतात. येथेदेखील हवशे-नवशे-गवशे, तात्पुरते, कायम असे विविध प्रकार असू शकतात. मित्र ज्या वर्तुळातला आहे, त्याप्रमाणे आपले त्याच्याशी बंध जुळलेले असतात.

**(निवृत्त वरिष्ठ सहायक संचालक (आस्थापना) मावज, महाराष्ट्र शासन.)**

# शिवविचारांची सजीव परंपरा

**योगेश मोरे**

***'शिवजयंती २०२६' निमित्त घाटकोपर (पूर्व) येथील शासकीय वसाहतीमध्ये विविध नावीन्यपूर्ण आणि प्रेरणादायी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. छत्रपतींच्या विचारांचा जागर व्हावा; तसेच युवा पिढीमध्ये आपल्या इतिहासाबद्दल अभिमान आणि जागरूकता निर्माण व्हावी, यासाठी वसाहतीतील मुलांनी स्वत: पोवाडे, समूहगायन यासह शिवनाट्याचे सादरीकरण केले. यंदाच्या शिवजयंतीचे मुख्य आकर्षण ठरली ती किल्ले बांधणी स्पर्धा...***

शिवजयंती २०२६ च्या या उपक्रमामागील उद्देश हाच छत्रपती शिवाजी महाराज यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व, त्यांचे आचार–विचार, त्यांची राष्ट्रनिष्ठा आणि लोकाभिमुख राज्यकारभार यांची ओळख युवा पिढीपर्यंत पोहोचविणे. इतिहास आणि संस्कार यांची सांगड घालून



पुढील पिढीमध्ये सकारात्मक विचार आणि राष्ट्रीय अभिमान जागविणे, हा या उपक्रमाचा मूलभूत हेतू होता.

गडकिल्ले स्पर्धा हा उपक्रम खऱ्या अर्थाने शिवविचारांची 'सजीव परंपरा' पुढे नेणारा ठरला. इतिहासाची जाणीव, सांस्कृतिक अभिमान आणि समाजातील एकोप्याची भावना यांचा सुंदर संगम या उपक्रमातून पाहायला मिळाला. अशा उपक्रमांमुळे युवा पिढीला केवळ माहितीच मिळत नाही, तर प्रेरणा आणि संस्कारही मिळतात. या स्पर्धेतून एक संदेश स्पष्टपणे दिला गेला, शिवरायांचा इतिहास हा केवळ भूतकाळाचा विषय नसून, तो आजच्या पिढीसाठी प्रेरणा देणारा जिवंत वारसा आहे आणि हा वारसा जतन करण्यासाठी अशा उपक्रमांची परंपरा सातत्याने पुढे नेणे हीच खरी शिवरायांना अभिवादन करण्याची सर्वोत्तम पद्धत ठरेल.

या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे किल्ल्यांचे सादरीकरण करताना मराठी आणि इंग्रजी दोन्ही भाषांमध्ये माहिती देण्याची तयारी स्पर्धकांनी केली



होती. जवळपास ५ ते १५ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांनी अत्यंत आत्मविश्वासाने किल्ल्यांचा इतिहास, त्यांची वैशिष्ट्ये आणि शिवरायांच्या कार्याची माहिती उपस्थितांना सांगितली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल अभ्यासाची आणि जिज्ञासेची भावना निर्माण झाली. एकापेक्षा एक आकर्षक अशा १५ किल्ल्यांनी वसाहतीमधील पटांगणात 'शिवसृष्टी किल्ले प्रदर्शन' रहिवाशांना अनुभवायला मिळाले.

या दोन दिवसांच्या उपक्रमादरम्यान एक अत्यंत सकारात्मक दृश्य पाहायला मिळाले. मोबाइल आणि टीव्ही स्क्रिनपासून दूर राहून मुले थेट मातीशी जोडली गेली होती. मातीचा सुगंध, किल्ल्यांची बांधणी, सहकार्याची भावना आणि ऐतिहासिक माहितीचा अभ्यास यामुळे त्यांचा वेळ अत्यंत अर्थपूर्ण पद्धतीने व्यतीत झाला. किल्ला अधिक वास्तवदर्शी आणि दर्जेदार कसा होईल, यासाठी मुले मनापासून प्रयत्न करत होती.

१४ आणि १५ फेब्रुवारी रोजी पार पडलेल्या या स्पर्धेत वसाहतीतील लहानग्यांपासून ते युवा–युवतींपर्यंत सुमारे २०० हून अधिक स्पर्धकांनी गटागटाने सहभाग नोंदवला. दोन दिवस चाललेल्या या उपक्रमामुळे



वसाहतीच्या परिसरात एक वेगळेच ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वातावरण निर्माण झाले होते. विशेष म्हणजे स्पर्धकांना त्यांच्या पालकांचे उत्स्फूर्त मार्गदर्शन लाभले. त्यामुळे किल्ल्यांची मांडणी, बांधणी; तसेच त्यामागील ऐतिहासिक माहितीचे सादरीकरण अत्यंत प्रभावी आणि वाखाणण्याजोगे झाले.

गडकिल्ले स्पर्धेची संकल्पना अत्यंत महत्त्वपूर्ण आणि अभिमानास्पद होती. छत्रपती शिवाजी महाराज यांचे गडकिल्ले जागतिक वारसास्थळांच्या यादीत समाविष्ट झाल्याचा गौरव ही या उपक्रमाची मध्यवर्ती संकल्पना होती. या माध्यमातून जागतिक पातळीवर नोंद झालेल्या आपल्या मौल्यवान ऐतिहासिक वारशाची माहिती युवा पिढीपर्यंत पोहोचविणे हा प्रमुख हेतू होता.

स्पर्धेत विद्यार्थ्यांनी अत्यंत कल्पकतेने आणि अभ्यासपूर्ण पद्धतीने विविध किल्ल्यांची उभारणी केली. त्यामध्ये रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, पुरंदर, सिंहगड, लोहगड, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग,



मुरुड–जंजिरा, अजिंक्यतारा, विशाळगड, तोरणा आणि सज्ञनगड या ऐतिहासिक किल्ल्यांचा समावेश होता. प्रत्येक किल्ल्याची मांडणी करताना त्याच्या भूगोल, वास्तुरचना आणि ऐतिहासिक महत्त्वाचा अभ्यास करून त्याचे सादरीकरण करण्यात आले होते.

छत्रपती शिवाजी महाराज यांचे किल्ले हे केवळ लष्करी ठिकाणे नव्हती, तर ते त्यांच्या दूरदृष्टी, स्थापत्य, कौशल्य आणि प्रशासकीय बुद्धिमत्तेचे प्रतीक होते. सागरी दुर्ग, गिरिदुर्ग आणि भूदुर्ग अशा विविध प्रकारच्या किल्ल्यांची उभारणी करून त्यांनी स्वराज्याची भक्कम सुरक्षा व्यवस्था निर्माण केली. त्यांच्या दुर्गरचनेत भौगोलिक परिस्थितीचा अचूक अभ्यास दिसून येतो. डोंगररांगा, समुद्रकिनारे, घाटमार्ग यांचा योग्य उपयोग करून त्यांनी शत्रूंसाठी अभेद्य अशी संरक्षणव्यवस्था उभी केली.

छत्रपती शिवाजी महाराजांना Father of the Indian Navy असे संबोधले जाते. समुद्री मार्गाने होणाऱ्या आक्रमणांची पूर्वकल्पना घेऊन त्यांनी मजबूत आरमार उभारले. महाराजांचे किल्ले हे जलव्यवस्थापनाच्या दृष्टीनेही अत्यंत अभ्यासपूर्ण होते. अनेक किल्ल्यांवर गोड्या पाण्याची टाकी, विहिरी आणि जलसाठ्याची व्यवस्था करण्यात आलेली होती. कठीण भौगोलिक परिस्थितीतही सैनिकांना पाण्याची कमतरता भासू



नये, यासाठी महाराजांनी विशेष काळजी घेतली होती. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ पराक्रमी योद्धे नव्हते, तर ते निसर्गावर निस्सीम प्रेम करणारे आणि शेती–कृषीचे पुरस्कर्ते होते. स्वराज्यातील शेतकरी, कारागीर आणि सामान्य जनतेचे जीवन सुरक्षित आणि समृद्ध व्हावे, यासाठी त्यांनी न्याय्य आणि लोकाभिमुख धोरणे राबवली. महाराजांच्या यशामागे त्यांच्या अभ्यासपूर्ण युद्धनीती आणि राज्यनीती यांचा मोठा वाटा होता. कोणत्याही मोहिमेपूर्वी त्या प्रदेशाच्या भौगोलिक परिस्थितीचा सखोल अभ्यास करूनच रणनीती आखली जात असे. या सर्व प्रक्रियेत त्यांच्या गुप्तचर यंत्रणेचे महत्त्व अनन्यसाधारण होते. बहिर्जी नाईक यांच्या नेतृत्वाखाली उभ्या केलेल्या गुप्तचर जाळ्यामुळे शत्रूच्या हालचालींची अचूक माहिती मिळत असे, अशी महत्त्वाची माहिती प्रत्येक स्पर्धकाने सादरीकणातून दिली.



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीदिनी त्यांचे विचार, नेतृत्वगुण हे ओल्या मातीत पेरण्याचा सकारात्मक प्रयत्न यंदाच्या शिवजयंतीनिमित्त करण्यात आला. प्रतिभाशाली, जाणत्या रयतेच्या राजाच्या विचारांचे अंकुर याच मातीतून पुन्हा उमलतील हा विचार म्हणजेच त्यांना खरे अभिवादन व या विचारातूनच शिवविचारांची सजीव परंपरा दृढ होईल.

**(उपसंपादक, मावज, महाराष्ट्र शासन.)**

# सूर्याचे सोनेरी कंकण

**सुनील करमरकर**

आपल्या लिमिटेड आयुष्यात बऱ्याच घटना घडत असतात. त्या सर्व पृथ्वीवरील घटकांशी संबंधित असतात; पण आकाशस्थ ग्रहगोलांचे खेळदेखील काही वेळेस आपल्या आयुष्यात येतात. त्यापैकीच एक घटना म्हणजे सूर्यग्रहण. वर्ष अखेरीस २६ डिसेंबर २०१९ रोजी दक्षिण भारतातून दिसणारे कंकणाकृती सूर्यग्रहण ही अशीच एक पर्वणी होती. आणि ती साधायचीच असं केव्हापासूनच ठरवलं होतं. चार महिने आधीच माहिती महाजालावर (इंटरनेट) शोध घेतला, तेव्हा हे ग्रहण दक्षिण भारतातील मेंगलोर (मंगळुरू) येथून पूर्ण रूपाने दिसणार असल्याचे कळले. लगेच ट्रेन व हॉटेल बुकींग करून टाकले. सूर्यग्रहण बघण्यासाठी आवश्यक सोलर फिल्म लावलेले चश्मे मराठी विज्ञान परिषदेचे राजीव चिटणीस यांनी नंबर दिलेल्या शैलेश संसारे यांच्याकडून घेतले.



एक दिवस आधी मेंगलोर (मंगळुरू) ला पोहोचलो. संध्याकाळी रेकी करायला बाहेर पडलो. ग्रहण सकाळी ८.०५ पासून सुरू होणार होतं. त्याचा मध्य ९.२४ ला होता. हॉटेलला गच्ची नव्हती. शहरात बऱ्यापैकी उंच इमारती, दाट झाडी. त्यामुळे पूर्व दिशा मोकळी असेल अशी जागा, एखादं मोकळं ग्राऊंड शोधायचं होतं. फिरत-फिरत एका चर्चपाशी आलो. तिथे समोर मोकळं ग्राऊंड होतं. त्याच कॅम्पसमध्ये त्यांचं कॉलेज पण होतं. गेटमधून आत जाऊन इकडे-तिकडे पाहात, अंदाज घेत होतो. तेवढ्यात तिथला वॉचमन दिसला. त्याला हिंदीमध्ये विचारायला सुरुवात केली की, सकाळी गेट उघडं असतं का, इथून ८ वा. सूर्य दिसतो का इ. तेवढ्यात त्यानेच सूर्यग्रहण बघण्यासाठी विचारताय का असं विचारलं आणि तिकडे ते सर उभे आहेत त्यांना भेटा असं सांगितलं. वा... म्हणजे बरोबर ठिकाणी आलो होतो. त्या कॉलेजचे प्रो. चंद्रशेखर भेटले. ते खरंतर गोव्याहून येणाऱ्या एका ग्रुपची वाट बघत होते; पण त्यांनी व्यवस्थित माहिती दिली की पाठीमागच्या इमारतीच्या गच्चीवर आम्ही टेलिस्कोप लावणार आहोत. दुसरे ग्रुपदेखील येणार आहेत. तुम्हीदेखील या, सर्वांना यायची मुभा आहे.

सकाळी ८.१५ लाच कॉलेजवर पोहोचलो. आकाश निरभ्र होतं. ऊन चांगलंच होतं. त्यांच्या गच्चीवर दोन-तीन ग्रुप आधीच दाखल झालेले होते. त्यांनी त्यांचे टेलिस्कोप, कॅमेरे सगळं सज्ज केलं होतं. ग्रहणाला सुरुवात झाली होती. त्यांच्या टेलिस्कोपमधून ते दृश्य पाहिलं. चंद्राची काळी छाया हळूहळू सूर्याला गिळत होती. एका गृहस्थांनी स्टिलची चाळणी आणली होती. त्याच्या भिंतीवर पाडलेल्या सावलीमधूनदेखील ग्रहण दिसत होतं.

वेळ पुढं-पुढं जात होता, तसा चंद्र सूर्यावर आपली काळी छाया जास्त पसरत होता. साधारण ७५-८० टक्के सूर्य झाकला गेल्यावर वातावरणात बदल जाणवायला लागला. ऊन थोडं सौम्य झालं. ऊन्हाला एक प्रकारची मरगळ आली. अचानक संध्याकाळ होतेय की काय अशी भावना झाली. तापमानातदेखील जाणवण्याइतका फरक झाला. सूर्य आता आणखी झाकला गेला होता. झाडांच्या पानांमधून पडणाऱ्या सावल्यांनादेखील चंद्रकोरीचा आकार आला. ग्रहणाचा मध्य आता जवळ आला होता. प्रो. चंद्रशेखरनी मेगाफोनवरून सूचना दिली की, आता पुढच्या काही क्षणात चंद्रबिंब बरोबर सूर्याच्या मध्यभागी येईल आणि सुमारे दोन मिनिटे ही स्थिती राहील. तेव्हा ग्रहण बघायचा चश्मा डोळ्यावर चढवा व तो काढू नका. त्यांच्या सूचनेप्रमाणे डोळ्यावर चश्मा चढवला.

चश्म्यातून सूर्यबिंब लालबुंद दिसत होतं. चंद्राची काळी सावली सरकत-सरकत सूर्यबिंबावर पूर्ण मध्यभागी आली. मध्यभागी पूर्ण गोल काळा चंद्र आणि त्याच्या कडेने सूर्यबिंबाची जाड बांगडी. सोनेरी कंकणच जणू. पुढची दोन मिनिटे ते अनिमिष दृश्य पाहण्यात कशी गेली ते समजलंच नाही. तो चंद्र सूर्यावरून पुढे-पुढे सरकतच होता. कंकणाकृती ग्रहणाची पूर्ण अवस्था संपायच्या मार्गावर होती आणि एका क्षणाला चंद्राची एक कड सूर्याच्या परिघाला चिकटली. आज अमावस्येला चंद्र पूर्ण गोल आणि सूर्याची कोर झाली होती. इथपर्यंत येण्याचं सार्थक झालं होतं.

आकाशाच्या विशाल पटावरच्या नाटकाने उत्कर्षबिंदू गाठला होता. वेळ अचूक साधली तर परप्रकाशी चंद्रसुद्धा देदीप्यमान सूर्याला झाकोळून निष्प्रभ करतो हे सिद्ध झालं होतं. आता चंद्रबिंब हळूहळू सूर्यावरून खाली-खाली उतरत आपल्या मार्गाने पुढच्या प्रवासाला जाणार होतं आणि सूर्य पुन्हा नेहमीच्याच प्रकाशाने झळाळून उठणार होता.

**(साहाय्यक मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, कोकण, महाराष्ट्र शासन)**

# चैत्र पाडवा : सातवाहन परंपरेतून उमललेले नववर्ष

**अश्विनी पुजारी**

भारतीय संस्कृतीत प्रत्येक सणामागे एक इतिहास, एक परंपरा आणि एक जीवनदृष्टी दडलेली असते. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात चैत्र शुद्ध प्रतिपदेचा दिवस 'चैत्र पाडवा' हा अशाच अर्थपूर्ण परंपरांचा वाहक आहे. विशेष म्हणजे ज्या-ज्या प्रदेशांवर सातवाहनांची सत्ता होती, त्या-त्या भागांत या दिवसापासून नववर्षाची सुरुवात होत असल्याचा उल्लेख आढळतो. ही केवळ कालगणनेची सुरुवात नसून, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेची जपणूक करणारी एक जिवंत परंपरा आहे.




**शालिवाहन शके (Shalivahan Shaka) : सर्वात प्रचलित मान्यतेनुसार, शालिवाहन नावाच्या कुंभाराच्या मुलाने शत्रूंचा पराभव करण्यासाठी मातीच्या सैनिकांचे पुतळे तयार केले. त्यावर पाणी शिंपडून त्यांनी या मातीच्या सैन्यात प्राण भरले आणि त्या सैन्याच्या मदतीने शत्रूचा पराभव केला. या विजयाप्रित्यर्थ शालिवाहन शके सुरू झाले. ज्याची सुरुवात गुढीपाडव्याने होते.**

सातवाहन साम्राज्य हे प्राचीन भारतातील एक प्रभावी आणि समृद्ध राज्य मानले जाते. त्यांच्या कारकिर्दीत व्यापार, कला, साहित्य आणि सामाजिक जीवन यांना मोठी चालना मिळाली. या समृद्धतेचा परावर्तित प्रभाव त्यांच्या कालगणनेवरही दिसून येतो. चैत्र महिन्याच्या प्रारंभी निसर्ग नव्या पालवीने नटतो, वातावरणात उत्साह भरतो आणि जीवनात नवचैतन्य निर्माण होते. अशा या सृष्टीच्या नवउत्थानाशी साधर्म्य साधत सातवाहनांनी नववर्षाची सुरुवात चैत्र पाडव्यापासून मान्य केली असावी, असे जाणकारांचे मत आहे.

महाराष्ट्रात आजही चैत्र पाडवा मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. घराघरांत गुढी उभारली जाते, जी विजय, समृद्धी आणि मंगलतेचे प्रतीक मानली जाते. गुढी उभारण्याची परंपरा केवळ धार्मिक विधी नसून, ती आपल्या इतिहासाची आणि सांस्कृतिक वारशाची साक्ष देणारी आहे. या दिवशी कडुलिंब-गुळाचे सेवन करण्यामागे जीवनातील कडू-गोड अनुभव स्वीकारण्याचा संदेश दडलेला आहे. नव्या वर्षाचे स्वागत करताना सकारात्मकतेने आणि आशावादाने पुढे जाण्याची प्रेरणा या सणातून मिळते.

'चैत्र पाडवा' हा सण केवळ घरगुती किंवा धार्मिक मर्यादेत न राहता सामाजिक एकात्मतेचे प्रतीक बनला आहे. विविध स्तरांतील लोक एकत्र येऊन नववर्षाचे स्वागत करतात, शुभेच्छांची देवाण-घेवाण करतात आणि नवीन संकल्प करतात. ग्रामीण भागात असो वा शहरी जीवनात, या दिवसाला विशेष महत्त्व दिले जाते.

आजच्या वेगवान आणि तंत्रज्ञानप्रधान युगातही चैत्र पाडव्याची परंपरा तितक्याच श्रद्धेने आणि अभिमानाने जपली जाते, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे. सातवाहनांच्या काळापासून सुरू झालेली ही नववर्ष परंपरा आजच्या आधुनिक महाराष्ट्रातही तितक्याच उत्साहाने साजरी होते, यावरून या परंपरेची सशक्तता आणि सातत्य स्पष्ट होते.

महाराष्ट्राची खास ओळख असलेला हा चैत्रपाडवा केवळ एक सण नाही, तर तो आपल्या सांस्कृतिक वारशाचा जिवंत दुवा आहे. इतिहासाच्या पाऊलखुणांवर चालत वर्तमानाला समृद्ध करणारा आणि भविष्याला दिशा देणारा हा सण प्रत्येक मराठी मनात नवचैतन्य निर्माण करतो. सातवाहनांच्या परंपरेतून आलेली ही नववर्षाची सुरुवात आजही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाला नवी उभारी देत आहे, हेच या परंपरेचे खरे वैशिष्ट्य आहे.

**(सहायक संचालक, महाराष्ट्र शासन.)**

# मैसूर
















(छायाचित्रे : अजय भोसले, अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन.)

# आयुष्य जगण्याचे डॉ. अब्दुल कलाम यांचे नियम



१) आयुष्य खडतर आहे, त्याची सवय करून घ्या.

२) जग कधीच तुमच्या स्वाभिमानाची पर्वा करत नाही. स्वतःबद्दल अभिमान बाळगण्याआधी काहीतरी करून दाखवा. स्वतःला सिद्ध करा.

३) कॉलेजमधून बाहेर पडल्या-पडल्या पाच आकडी पगाराची अपेक्षा करू नका. एका रात्रीत कोणी वाईस प्रेसिडेंट होत नाही, त्या पदापर्यंत पोहोचण्यासाठी अपार कष्ट करावे लागतात.

४) आज कदाचित तुम्हाला तुमचे शिक्षक कडक आणि भीतीदायक वाटत असतील, कारण अजून बॉस नावाचा प्राणी तुमच्या आयुष्यात यायचाय.

५) तुम्ही केलेली चूक ही सर्वस्वी तुमची चूक आहे आणि तुमचा पराजय हा सर्वस्वी तुमचा पराजय आहे. कोणाला दोष देऊ देऊ नका. झालेल्या चुकीपासून धडा घ्या आणि पुढे चालत राहा.

६) तुमचे पालक तुम्ही जन्माला यायच्या आधी एवढे कंटाळवाणे आणि अरसिक नव्हते, जेवढे तुम्हाला ते आता वाटतात. तुमचेच संगोपन करण्यासाठी त्यांनी जे अमाप कष्ट घेतलेत. त्यामुळेच आज त्यांचा स्वभाव असा झाला आहे.


७) उत्तेजनार्थ पारितोषिक हा प्रकार फक्त शाळेतच पाहायला मिळतो. काही शाळांमध्ये तर अगदी पास होईपर्यंत परीक्षा देता येते. बाहेरच्या जगातील पद्धत मात्र वेगळीच असते. खऱ्या जगात हरणाऱ्याला कोणीही दुसरी संधी देण्यास तयार नसतो.

८) आयुष्याच्या शाळेत इयत्ता आणि तुकडी नसते. त्यामध्ये मे महिन्याची सुट्टी नसते, स्वतःचा शोध घ्यायला, नवीन काही शिकायला कोणी तुम्हाला वेळ देत नाही. तो वेळ तुम्हालाच शोधायचा असतो.

९) टीव्हीवरचे जीवन काही खरे नसते आणि खरे आयुष्य म्हणजे टीव्हीवरची सीरियल नसते. खऱ्या आयुष्यात आराम नसतो, असते ते फक्त काम आणि काम.

१०) स्वप्न ते नाही, जे तुम्ही रात्री झोपेत बघतात, स्वप्न ते आहे, जे तुम्हाला झोपूच देत नाही.

**टीम आपलं मंत्रालय**



# साहित्य अकादमी पुरस्कार २०२५ जाहीर; ‘काळ्यानिळ्या रेषा’साठी सन्मान

**मनिषा पिंगळे**

भारतीय साहित्य क्षेत्रातील अत्यंत मानाचा समजला जाणारा ‘साहित्य अकादमी पुरस्कार २०२५’ जाहीर करण्यात आला आहे. देशातील मान्यताप्राप्त २४ भाषांमधील उत्कृष्ट साहित्यकृतींची निवड यंदा करण्यात आली असून, मराठी भाषेतील ‘काळ्यानिळ्या रेषा’ या आत्मकथेसाठी लेखक राजू बाविस्कर यांना साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे.

भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या आधिपत्याखाली कार्यरत असलेली साहित्य अकादमी ही स्वायत्त राष्ट्रीय संस्था भारतीय भाषांमधील साहित्याच्या संवर्धनासाठी विविध उपक्रम राबविते. दरवर्षी विविध भाषांतील उत्कृष्ट साहित्यकृतींची निवड करून संबंधित लेखकांना सन्मानित करण्याची परंपरा अकादमीकडून सातत्याने जपली जात आहे.

‘काळ्यानिळ्या रेषा’ या आत्मकथेत लेखकाने स्वतःच्या आयुष्यातील अनुभव, सामाजिक वास्तव, संघर्षमय प्रवास आणि वैचारिक घडण यांचे प्रभावी चित्रण केले आहे. या साहित्यकृतीमुळे मराठी साहित्यविश्वात नवे चिंतन आणि वास्तवदर्शी दृष्टिकोन समोर आल्याचे मानले जाते. या पुरस्कारामुळे मराठी भाषेचा आणि साहित्याचा गौरव अधिक वृद्धिंगत झाला आहे.

यंदाच्या पुरस्कारांमध्ये काव्यसंग्रह, कादंबरी, कथासंग्रह, निबंध, समीक्षा, आत्मकथा आणि संस्मरण अशा विविध साहित्यप्रकारांतील पुस्तकांचा समावेश आहे. देशातील विविध भाषिक परंपरांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या साहित्यकृतींची निवड तज्ज्ञ समितीमार्फत करण्यात आली आहे. मराठी भाषेसाठीच्या निवड प्रक्रियेत ज्येष्ठ साहित्यिक मंगला गोडबोले, नागोराव तम्माजी उटकर आणि राजन गवस यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

साहित्य अकादमी पुरस्कारामध्ये मानचिन्ह, शाल आणि एक लाख रुपये रोख रक्कम देण्यात येते. या पुरस्कारांचे वितरण ३१ मार्च २०२६ रोजी नवी दिल्ली येथे आयोजित विशेष समारंभात करण्यात येणार आहे.

**(वरिष्ठ सहायक संचालक, दिल्ली, महाराष्ट्र शासन.)**

**साहित्य अकादमी पुरस्कार २०२५**
**भाषा, पुस्तक व लेखक पुढीलप्रमाणे :**

- **असमिया – कड़ि खेलर साधु (उपन्यास)** – देवब्रत दास
- **बांगला – श्रेष्ठ कबिता (कविता)** – प्रसून बंदोपाध्याय
- **बोडो दोंनै लामाः मोनसे गाथोन (उपन्यास)** – सहायसुलि ब्रह्म
- **डोगरी – ‘ठाकुर’ सतसई (कविता, दोहे)** – खजूर सिंह ‘ठाकुर’
- **इंग्रजी – क्रिमसन स्प्रिंग (उपन्यास)** – नवतेज सरना
- **गुजराती – भट्टखडकी (कविता)** – योगेश वैद्य
- **हिंदी – जीते जी इलाहाबाद (संस्मरण)** – ममता कालिया
- **कन्नड – दडा सेरिसु तंदे (कहानी)** – अमरेश नुगडोणी
- **काश्मीरी – नजदावनेकी पॉट अलाव (कविता)** – अली शैदा
- **कोंकणी – कोंकणी काव्यें: रुपां आनी रूपकां (आलोचनात्मक निबंध)** – हेनरी मेंडोनका (एच. एम. पेरनाळ)
- **मैथिली – धात्री पात सन गाम (संस्मरण)** – महेन्द्र
- **मलयाळम् – मायामानुष्यर (उपन्यास)** – एन. प्रभाकरन
- **मणिपुरी – कंगलमद्रीब इफुत (कहानी)** – हाओबम नलिनि
- **मराठी – काळ्यानिळ्या रेषा (आत्मकथा)** – राजू बाविस्कर
- **नेपाली – नेपाली पारम्परिक संस्कृति सभ्यताको ढुकुटी (निबंध)** – प्रकाश भट्टराई
- **ओड़िआ – पदपुराण (कविता)** – गिरिजाकुमार बलियारसिंह
- **पंजाबी – सेफ्टी किट (कहानी)** – जिंदर
- **राजस्थानी – भरखमा (कहानी)** – जितेंद्र कुमार सोनी
- **संस्कृत – प्रस्थानचतुष्टये ब्रह्मघोषः (कविता)** – महामहोपाध्याय साधु भद्रेशदास
- **संताली – मिड बिर्ना चेनने साओन इनाग सागई (कहानी)** – सुमित्रा सोरेन
- **सिंधी – वाघू (कहानी)** – भगवान अटलानी
- **तमिळ – तमिळ सिरुकथैयिन थडंगल (साहित्यिक आलोचना)** – सा. तमिळसेलवन
- **तेलुगु – अनिमेष (कविता)** – नंदिनी सिद्धरेड्डी
- **उर्दू – सफर जारी है (कविता)** – प्रितपाल सिंह बेताब

# गल्फ फूड २०२६ : दुबई वर्ल्ड ट्रेड सेंटर

**डॉ. प्रकाश कोंडेकर**

गेली ३१ वर्ष दुबईत हा खाद्यपदार्थ मेळावा साजरा केला जातो; पण यंदा भारत सरकारचा प्रथमच सहभाग होता. मी या मेळाव्याबद्दल बरीच वर्षे ऐकून होतो; पण या वर्षी प्रत्यक्षात जाण्याचा योग आला.

## गल्फ फूड हा जगातील सर्वात मोठा वार्षिक अन्न व पेय व्यापार

हे प्रदर्शन २६ जानेवारी २०२६ ते ३० जानेवारी २०२६ पर्यंत होते. हे प्रदर्शन इतके सुंदर व भव्य होते की, पाचही दिवस हजेरी लावूनसुद्धा काही भाग बघता नाही आले.

या प्रदर्शनात जवळजवळ ६०००+ गाळे होते ज्यात अन्न पेय उत्पादक, आयात-निर्यातदार, वितरक व घाऊक व्यापारी, रिटेल चेन व सुपर मार्केट, खाद्य सेवा व हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील व्यावसायिक, सरकारी व्यापार संस्था इ. सहभागी होते.


प्रदर्शनात मध्यपूर्व, आफ्रिका, आशिया, युरोप व अमेरिकेतील, जवळजवळ १९० देशांचा सहभाग होता. प्रदर्शनाला जवळपास दीड लाख लोकांनी हजेरी लावली.

प्रदर्शनात वेगवेगळे विभाग होते, त्यातील काही... दुग्धजन्य पदार्थ, मांस व कुक्कुटपालन, डाळी, धान्ये व तृणधान्ये, वनस्पती आधारित आरोग्यदायी अन्न, पेये, तेल व चरबी वगैरे.

या प्रदर्शनात सहभागी होणाऱ्यांना, जागतिक प्रभावी व्यासपीठ मिळाले. नवीन उत्पादने प्रदर्शित करणे, नवनवीन संकल्पना पाहणे, आंतरराष्ट्रीय खरेदीदारांशी संबंध निर्माण करणे वा वाढवणे अशा खूप बाबींवर चर्चा करता आली.

अपेडा, भारतीय कंसुलेट, भारत व महाराष्ट्र सरकार यांच्या प्रतिनिधींशी प्रत्यक्ष संवाद साधता येणे, हेही काही फायदे झाले.

माझा सहभाग CASMB (Chamber for Advancement of





Small and Medium Business) यांचा सल्लागार म्हणून होता. तिथे आम्ही आमचे आंतरराष्ट्रीय त्रैमासिक पूर्णब्रम्ह अंकाचे प्रकाशन केले. जवळपास २५ देशांशी आम्ही आमचे संबंध प्रस्थापित करू शकलो.

अशा प्रकारे हे प्रदर्शन म्हणजे एक अविस्मरणीय अनुभव होता.

**(बी.एस्सी. (ऑनर्स), एम.डी. (होमिओपॅथी), एन.डी., आयुर्वेद रत्न, एल.एल.बी. फेलो - रॉयल सोसायटी ऑफ हेल्थ (लंडन), बीटीईआर (यू.के.) सल्लागार (CASMB), संचालक, भारतीय निसर्गोपचार संस्था.)**



# कृत्रिम बुद्धिमत्ता भाग – १
# कल्पनेपासून क्रांतीपर्यंतचा महाप्रवास




**प्रशांत वामन**

मानवी इतिहासामध्ये अनेक क्रांतिकारी शोध लागले, परंतु 'कृत्रिम बुद्धिमत्ता' (Artificial Intelligence - AI) हा असा एक शोध आहे ज्याने मानवाच्या 'बुद्धिमत्ता' या संकल्पनेलाच आव्हान दिले आहे. आज आपण चॅटजीपीटी (ChatGPT), स्वयंचलित कार आणि चेहऱ्यावरून ओळख पटवणारे तंत्रज्ञान वापरतो, तेव्हा आपल्याला वाटते की हे सर्व नवीन आहे, परंतु AI चा विचार आणि त्याचे मूळ हजारो वर्षे जुने आहे.

## प्राचीन काळ : कल्पनाशक्ती आणि पौराणिक कथा

AI चा उगम केवळ विज्ञानात नसून तो मानवी कल्पनाशक्तीमध्ये आहे. प्राचीन ग्रीक संस्कृतीत 'तालोस' (Talos) नावाच्या एका महाकाय कांस्य मानवाचा उल्लेख आढळतो, जो क्रीट बेटाचे रक्षण करण्यासाठी बनवला गेला होता. तसेच भारतीय कथांमध्ये 'यंत्रमानवांचा' उल्लेख येतो. या कथांमधून एक गोष्ट स्पष्ट होते– मानवाला नेहमीच स्वतःसारखी विचार करणारी आणि काम करणारी प्रतिकृती बनवण्याची ओढ होती. मध्ययुगीन काळात अनेक शास्त्रज्ञांनी 'ऑटोमॅटा' (Automata) म्हणजे स्वतःहून चालणारी यंत्रे बनवण्याचे प्रयत्न केले, जे आजच्या रोबोटिक्सचे पूर्वज मानले जातात.

## १९ वे शतक : गणिती तर्कांचा पाया

खऱ्या अर्थाने वैज्ञानिक प्रगती १९व्या शतकात झाली. ब्रिटिश गणितज्ज्ञ जॉर्ज बूल यांनी 'बूलियन अल्जेब्रा' मांडला, ज्याने तर्काला (Logic) गणिती रूप दिले. दरम्यान, चार्ल्स बॅबेज यांनी 'ॲनालिटिकल इंजिन'ची रचना केली. या इंजिनसाठी जगातील पहिला प्रोग्राम लिहिणाऱ्या ॲडा लव्हलेस यांनी एक अत्यंत दूरदृष्टीचा विचार मांडला. त्यांनी म्हटले होते की, यंत्रे केवळ आकडेमोड करण्यासाठी नसून, ती

संगीत किंवा चित्रांसारख्या गुंतागुंतीच्या गोष्टीही हाताळू शकतील. हाच विचार पुढे जाऊन AI चा पाया ठरला.

## १९५० चे दशक : लन ट्युरिंग आणि वैज्ञानिक क्रांती

आधुनिक AI चे श्रेय प्रामुख्याने लन ट्युरिंग यांना जाते. दुसऱ्या महायुद्धात जर्मन कोड 'एनिग्मा' फोडल्यानंतर ट्युरिंग यांनी यंत्रांच्या विचार करण्याच्या क्षमतेवर लक्ष केंद्रित केले. १९५० मध्ये त्यांनी Computing Machinery and Intelligence हा शोधनिबंध लिहिला. त्यात त्यांनी 'ट्युरिंग टेस्ट' (Turing Test) सुचवली.

या चाचणीचा मुख्य उद्देश हा होता की, जर एखादे यंत्र माणसाशी अशा प्रकारे संवाद साधू शकले की, माणसाला ते यंत्र आहे, हे ओळखता आले नाही, तर त्या यंत्राला 'बुद्धिमान' मानले जावे. ट्युरिंग यांनी मांडलेली ही संकल्पना आजही AI च्या क्षेत्रात सुवर्णमानक मानली जाते.

## १९५६: डार्टमाउथ परिषद आणि 'AI' शब्दाचा जन्म

१९५६ मध्ये अमेरिकेतील डार्टमाउथ कॉलेजमध्ये एक ऐतिहासिक कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या परिषदेत जॉन मॅककार्थी, मार्विन मिन्स्की, क्लॉड शॅनन आणि नॅथॅनियल रॉचेस्टर यांसारखे दिग्गज एकत्र आले. जॉन मॅककार्थी यांनी पहिल्यांदा Artificial Intelligence ही संज्ञा वापरली. या परिषदेचा असा विश्वास होता की, मानवी शिक्षणाचा कोणताही पैलू इतक्या अचूकपणे मांडला जाऊ शकतो की, तो यंत्राद्वारे सिम्युलेट करणे शक्य होईल. याच काळात 'लॉजिक थिअरिस्ट'सारखे प्रोग्राम्स तयार झाले, जे गणितातील कठीण प्रमेये सोडवू शकत होते.

## सुरुवातीचा उत्साह आणि 'AI विंटर' (१९६० – १९९०)

१९६० च्या दशकात AI संशोधनात प्रचंड गुंतवणूक झाली. शास्त्रज्ञांनी 'ELIZA' नावाचा पहिला चॅटबॉट तयार केला, जो एखाद्या मानसोपचारतज्ज्ञाप्रमाणे संवाद साधायचा. मात्र, लवकरच मर्यादा स्पष्ट होऊ लागल्या. त्या काळच्या संगणकांची मेमरी आणि वेग (Processing Power) अत्यंत कमी होता. जेव्हा संशोधकांनी दिलेली मोठी आश्वासने पूर्ण झाली नाहीत, तेव्हा सरकार आणि गुंतवणूकदारांनी निधी रोखला.



१९७४ ते १९८० आणि १९८७ ते १९९३ या काळाला 'AI Winter' (AI चा हिवाळा) असे म्हटले जाते. या काळात या क्षेत्राची प्रगती मंदावली, परंतु काही संशोधकांनी 'न्यूरल नेटवर्क्स' (मानवी मेंदूच्या पेशींप्रमाणे काम करणारी यंत्रणा) यावर गुपचूप काम सुरू ठेवले.

## पुनरुज्जीवन : बुद्धिबळ आणि बिग डेटा (१९९० – २०१०)

१९९० नंतर संगणकीय शक्ती वाढू लागली. १९९७ मध्ये IBM च्या 'Deep Blue' ने जागतिक बुद्धिबळ विजेता गॅरी कास्पारोव्ह याचा पराभव केला. ही घटना जगासाठी एक संकेत होती की AI आता केवळ प्रयोगापुरते मर्यादित राहिलेले नाही. २००० च्या दशकात इंटरनेटचा प्रसार झाला आणि 'बिग डेटा' (Big Data) उपलब्ध झाला. AI ला शिकण्यासाठी लागणारी प्रचंड माहिती आता इंटरनेटच्या माध्यमातून मिळू लागली.

## २०१० ते आज : डीप लर्निंग आणि जनरेटिव्ह AI

२०१० नंतर AI मध्ये खऱ्या अर्थाने स्फोट झाला. 'डीप लर्निंग' (Deep Learning) या तंत्रामुळे संगणक आता स्वतःहून प्रतिमा (Images), आवाज आणि भाषा ओळखू लागले. २०१२ मधील 'ImageNet' स्पर्धेत एका न्यूरल नेटवर्कने मानवापेक्षा अचूकपणे चित्रे ओळखली.

आज आपण जनरेटिव्ह AI (Generative AI) च्या युगात आहोत. ChatGPT, Google Gemini आणि Midjourney सारखी साधने केवळ उत्तरे देत नाहीत, तर ती नवीन लेख लिहू शकतात, चित्रे काढू शकतात आणि कोडिंग करू शकतात. हे 'लार्ज लँग्वेज मॉडेल्स' (LLMs) अब्जावधी शब्दांच्या डेटावर प्रशिक्षित आहेत, ज्यामुळे त्यांचा संवाद मानवासारखाच वाटतो.

## AI चे फायदे आणि आव्हाने

AI मुळे वैद्यकीय क्षेत्रात रोगांचे अचूक निदान होत आहे, शिक्षणात वैयक्तिक मार्गदर्शन मिळत आहे आणि हवामान बदलासारख्या समस्यांवर उपाय शोधले जात आहेत. मात्र या तंत्रज्ञानासोबत काही आव्हानेही आहेत :

**रोजगार :** अनेक नोकऱ्यांवर AI मुळे गदा येण्याची भीती आहे.

**नैतिकता (Ethics) :** AI ने घेतलेले निर्णय किती निष्पक्ष आहेत?

**सुरक्षा :** डीपफेक (Deepfake) आणि चुकीच्या माहितीचा प्रसार रोखणे हे मोठे आव्हान आहे.


## भविष्य : कृत्रिम सामान्य बुद्धिमत्ता (AGI)

आता शास्त्रज्ञांचे लक्ष 'Narrow AI' (जे फक्त एकच काम करू शकते) कडून 'Artificial General Intelligence' (AGI) कडे वळले आहे. AGI म्हणजे असे यंत्र जे मानवाप्रमाणे कोणतेही बौद्धिक काम करू शकेल. जरी हे अद्याप दूरचे स्वप्न वाटत असले, तरी ज्या वेगाने प्रगती होत आहे, ते पाहता भविष्य रोमांचक आणि तितकेच आव्हानात्मक असेल.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रवास हा मानवाच्या कल्पकतेचा आणि चिकाटीचा प्रवास आहे. तत्त्वज्ञानाच्या चर्चांपासून सुरू झालेला हा प्रवास आज आपल्या खिशातील स्मार्टफोनपर्यंत पोहोचला आहे. AI हे केवळ एक तंत्रज्ञान नसून, ते मानवाच्या उत्क्रांतीतील एक महत्त्वाचे साधन आहे. आपण या साधनांचा वापर किती जबाबदारीने करतो, यावरच मानवी संस्कृतीचे भविष्य अवलंबून आहे.

**(कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन. मोबाइल क्र: ८९८३३४४३६७)**

# चॅटबॉट म्हणजे काय?




चॅटबॉट हा एक संगणकीय सॉफ्टवेअर अनुप्रयोग आहे, जो मजकूर (Text) किंवा आवाज (Voice) यांच्या माध्यमातून मानवासारखा संवाद साधण्यासाठी तयार करण्यात आलेला असतो. वापरकर्ता डिजिटल साधनांशी जणू एखाद्या व्यक्तीशी बोलत आहे, अशा प्रकारे तो संवाद साधू शकतो.

काही चॅटबॉट साध्या, पूर्वनियोजित नियमांवर आधारित असतात; तर काही प्रगत कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) आणि नैसर्गिक भाषा प्रक्रिया (Natural Language Processing - NLP) तंत्रज्ञानाचा वापर करून गुंतागुंतीचे प्रश्न समजून घेऊन योग्य प्रतिसाद देतात.

## चॅटबॉटची मुख्य वैशिष्ट्ये

**१. उद्देश :**

- २४ तास ग्राहक सेवा प्रदान करणे.
- नियमित व पुनरावृत्ती होणारी कामे स्वयंचलित करणे.
- बँकिंग, आरोग्यसेवा, किरकोळ विक्री इत्यादी क्षेत्रांतील चौकशी हाताळणे.

**२. प्रकार :**

**नियमाधारित (Rule-based) चॅटबॉट :** पूर्वनिश्चित नियमांनुसार कार्य करतात. त्यांच्या प्रोग्रामिंगच्या बाहेरील प्रश्न ते समजू शकत नाहीत.


**संवादी / कृत्रिम बुद्धिमत्ता–आधारित (AI-based) चॅटबॉट :** मशीन लर्निंगच्या साहाय्याने वापरकर्त्याचा हेतू समजून घेतात, संदर्भ ओळखतात व अधिक वैयक्तिकृत उत्तरे देतात.

**३. उदाहरणे :**

Siri, Alexa, विविध संकेतस्थळांवरील ग्राहक सेवा बॉट्स.

**चॅटबॉट कसे कार्य करतात?**

चॅटबॉट वापरकर्त्याचा मजकूर किंवा आवाजातील संदेश विश्लेषित करतात आणि त्यामागील हेतू (Intent) ओळखतात. त्यानंतर योग्य प्रतिसाद निवडण्यासाठी अल्गोरिदमचा वापर केला जातो. आधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता–आधारित चॅटबॉट डीप लर्निंग आणि न्यूरल नेटवर्क्सचा उपयोग करून अधिक नैसर्गिक, सुसंगत व अर्थपूर्ण संवाद साधतात.



## अ. भा. ना. से. संगीत, नृत्य व लघुनाट्य २०२५–२६

**सर्वोत्कृष्ट नाटक** – सुवर्ण – निर्णय ● **सर्वोत्कृष्ट अभिनेत्री** – सुवर्ण – दिपिका महाजन **सर्वोत्कृष्ट साहाय्यक अभिनेत्री** – सुवर्ण – मंगल नाखवा ● **सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक** – सुवर्ण– अपर्णा जाधव ● **सर्वोत्कृष्ट अभिनेता** – रौप्य – यतिन तोसकर

**एकूण ५ बक्षिसे** – महाराष्ट्र संघाचे खूप खूप अभिनंदन...



# दगडी भिंतीला यशाचा मुकुट

## ६४ व्या हौशी मराठी राज्य नाट्य स्पर्धेचा जल्लोष




मराठी रंगभूमीची परंपरा समृद्ध करणाऱ्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेची अंतिम फेरी रंगतदार वातावरणात पार पडली आणि या सोहळ्यात डोंबिवली येथील श्रीकला संस्कार न्यास या संस्थेच्या 'दगडी भिंत' या नाटकाने सर्वांचे लक्ष वेधून घेत प्रथम क्रमांक पटकावला. उत्कृष्ट सादरीकरण, प्रभावी दिग्दर्शन आणि तांत्रिक अंगांची भक्कम साथ यामुळे या नाटकाला रुपये सहा लाखांचे मानाचे प्रथम पारितोषिक मिळाले.

या स्पर्धेत रंगभूमीवरील विविध प्रयोग, नव्या कल्पना आणि ताकदीचा अभिनय यांचा सुंदर संगम पाहायला मिळाला. बारामती येथील नटराज नाट्य कला मंडळ यांच्या 'कर्ण' या नाटकाने द्वितीय क्रमांक मिळवत चार लाखांचे पारितोषिक प्राप्त केले, तर मुंबईतील नवहिंद बालमित्र मंडळ यांच्या 'द हिंदू लेडी' या नाटकाने तृतीय क्रमांक पटकावत दोन लाखांचे पारितोषिक मिळवले.


स्पर्धेतील वैयक्तिक पारितोषिकांनीही अनेक कलावंतांच्या प्रतिभेला दाद दिली. 'दगडी भिंत' या नाटकाचे दिग्दर्शक आशुतोष वाघमारे यांनी प्रभावी दिग्दर्शनासाठी प्रथम पारितोषिक पटकावले. नेपथ्य, प्रकाश योजना, रंगभूषा आणि संगीत दिग्दर्शन या तांत्रिक विभागांतही अनेक कलाकारांनी आपल्या कौशल्याने नाटकांना वेगळी उंची दिली. या सर्व घटकांच्या एकत्रित परिणामामुळे रंगमंचावर साकारलेली प्रत्येक कलाकृती प्रेक्षकांसाठी अविस्मरणीय ठरली.

अभिनयाच्या विभागातही अनेक कलाकारांनी प्रभावी कामगिरी केली. पुरुष आणि स्त्री कलाकारांच्या अभिनयाने विविध व्यक्तिरेखा जिवंत झाल्या आणि प्रेक्षकांनी त्यांना भरभरून दाद दिली. या कलाकारांना रौप्य पदकांनी गौरविण्यात आले, तर काहींना गुणवत्ता प्रमाणपत्रे देऊन त्यांच्या प्रतिभेचा सन्मान करण्यात आला.


स्पर्धेच्या अंतिम फेरीत एकूण ४६ नाट्यप्रयोग सादर झाले. प्रत्येक प्रयोगामागे कलाकारांची मेहनत, नवनवीन प्रयोगशीलता आणि रंगभूमीबद्दलची ओढ स्पष्टपणे जाणवत होती. परीक्षकांच्या काटेकोर मूल्यमापनातून निवडले गेलेले हे विजेते मराठी रंगभूमीच्या समृद्ध परंपरेचेच द्योतक ठरले.


या स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व संस्था आणि कलाकारांनी सादर केलेल्या दर्जेदार नाटकांना प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मराठी रंगभूमीची ही सर्जनशील परंपरा भविष्यातही अशाच नव्या उंची गाठत राहावी आणि हौशी कलाकारांनी आपल्या कलेतून समाजाला विचार देणारी, मनाला भिडणारी नाटके सादर करावीत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.


# लिहिते व्हा... आपलं मंत्रालय





माहिती व जनसंपर्क महासंचालनालयनिर्मित 'आपलं मंत्रालय' (डिजिटल आवृत्ती) तयार करण्याचे नियोजित आहे. मंत्रालयातील विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी यांनी आपल्या कथा, कविता, स्वानुभव, पाककला, भ्रमंती, व्यंगचित्रे, विशेष छायाचित्रे; तसेच विभागातील पदोन्नती, निवृत्ती याबद्दल 'आपलं मंत्रालय' या गृहपत्रिकेसाठी लेखन साहित्य *(युनिकोड वर्ड फाईल स्वरूपात)* खालील दिलेल्या ई-मेलवर पाठवावेत.













## आपलं मंत्रालय

प्रकाशने शाखा, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, १७ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई. ई-मेल : **aaplemantralay@gmail.com**

**Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR**

**Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR**